www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 226 वा बुधवार दि. ३० एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## अजिंठा येथील नाभिक समाजाच्या अधिकृत स्मशानभूमीवर अतिक्रमण



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील शिवना येथील नाभिक समाजाच्या स्मशानभूमीवरील अतिक्रमणावरुन घडलेले प्रकरण ताजे असतानाच अजिंठा येथील नाभिक समाजाच्या स्मशानभूमीवर अतिक्रमण झाल्याची घटना उघड झाल्याची तक्रार दाखल झाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की , अजिंठा येथे किमान १५ न्हावी कुटुंबे राहत असून पूर्वापार पासून ते आणि त्यांची पूर्वज मयत झालेल्या नाभिक व्यक्तींचे गट न 162 मध्येच अंत्यसंस्कार करत आलेलो असत त्यामुळे सदरील नाभिक स्मशानभूमी अशी नोंद सातबारावर देखील झालेली होती. मात्र गेल्या काही दिवसापासून सदरील स्मशानभूमीच्या जागेवर गावातीलच एका व्यक्तीने अतिक्रमण करून ताबा मिळवलेला आहे. त्यामुळे नाभिक समाजातील मयत व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यात अडचणी निर्माण होत आहे . सबंधित व्यक्तीस नाभिक बांधवांनी त्याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडून वारंवार जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात येत असतात अशी माहिती अजिंठा येथील नाभिक बांधवांनी तहसीलदार आणि गट विकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. गट न १६२ वरील अधिकृत आणि पारंपरिक न्हावी स्मशानभूमीच्या संबंधितांनी केलेले अतिक्रमण काढून त्या जागेची मोजणी करून त्याचा ताबा आम्हाला द्यावा. म्हणजे अंत्यसंस्कारवरून भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही अशीही मागणी नाभिक बांधवांनी दिलेल्या निवेदनात केलेली आहे. शिवना येथील प्रकरण ताजे स्मशानभूमीत अतिक्रमण केल्याच्या घटनेवरून काही मागील वर्षी तालुक्यातीलच शिवना येथील नाभिक बांधवांनी मृतदेह तहसीलच्या आवारात आणून अंत्यसंस्कार करण्याचा पवित्रा घेतला होता. मात्र प्रशासनाने नाभिक बांधवांची समजूत काढून पोलीस बंदोबस्तात शिवना येथे अंत्यसंस्कार पार पडले होते. जिल्हाधिकारी यांनी याकडे लक्ष द्यावे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी १५ एप्रिल ते २५ मे दरम्यान राबविण्यात येत असलेल्या स्मशानभूमी अभियान अंतर्गत शिवना गावासह अजिंठा गावातील नाभिक समाज स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करून महसूल विभागामार्फत मोजून नाभिक समाजाच्या ताब्यात द्यावी म्हणजे भविष्यात अंत्यसंस्कार वरून वाद होणार नाहीत. अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष श्री संतोष बोराडे यांनी दिली आहे.

# विहिरीतल्या पाण्यावर दरोडा!

## चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या हजारो लिटर पाण्यावर 'असा' मारला डल्ला

बीडमधून एक धक्कादायक बातमी समोर आलीय. तुम्ही मकरंद अनासपुरेंचा जाऊ तिथे खाऊ हा सिनेमा बघितला असेल.. त्यात शेतकऱ्याची विहीर चोरीला जाते. मात्र बीडमध्ये त्याचा पुढचा अंक बघायला मिळाला. इथं विहिरीतलं पाणीच चोरीला गेलंय. नेमकं काय घडलंय. जाणून घेऊयात. रंभा काशिद यांच्यावर हताश होऊन पदर पसरवत धाय मोकलून रडण्याची वेळ आलीय. बीडच्या साक्षाळ पिंपरी गावतले हे रंभा आणि त्र्यंबक काशिद दाम्पत्य 4 दिवस पाहुण्यांच्या गावी गेले. आणि मागे विपरीत घडलं. त्यांच्या विहिरीतलं 4 ते 5 टँकर पाणी चोरीला गेलं. चोरट्यांनी उरलं सुरलं पाणीही गढूळ करुन सोडलं. काशिद कुटुंब जेव्हा गावात परत आलं तेव्हा त्यांना विहिरीनं तळ गाठलेला बघून धक्काच बसला. घरातल्या माऊलीने तर पिकं जगवायची कशी म्हणून हंबरडा फोडला.

त्र्यंबक काशिद यांची अवघी 3 एकर शेती आहे. तिथं त्यांनी विविध फळबाग आणि झाडांची लागवड केली होती. गेल्यावर्षी पाण्याअभावी अनेक फळझाडं जळून गेली म्हणून त्र्यंबक काशिद यांनी विहीर बांधली. त्यात सध्या अडीच परस पाणी होतं. ते सगळ्यांनी चोरुन नेलं. उरलेलं बांधाला सोडलं. चोर इथंच थांबले नाहीत तर त्यांनी डीपी आणि मोटारीची तोडफोड केली. विहिरीतलं पाणी चोरीला





गेल्याची बातमी बीड जिल्ह्यात वाऱ्यासारखी पसरली. या प्रकरणात आता शिवसेना ठाकरे गटांनही लक्ष घातलंय. पोलिसांनी तातडीनं या पाणीचोरांचा छडा लावण्याची मागणी त्यांन केलीय. एरवी दरोडा, घरफोडी, साहित्यांची चोरी अशा चोरीच्या घटना दररोज आपल्या कानावर पडत असतात. मात्र गुन्हेगारीच्या बिहारी पॅटर्नमुळे चर्चेत असलेल्या बीड जिल्ह्यात चोरीचा वेगळाच पॅटर्न समोर आलाय. बीडच्या मातीत जन्मलेले मराठी अभिनेते मकरंद अनासपुरेंचा 'जाऊ तिथे खाऊ' या चित्रपटात विहिरी चोरीला गेलेला किस्सा आपण पाहिला. आता त्यांच्याच जिल्ह्यात विहिरीतलं पाणी चोरीला गेलंय. यातून चोरांनी गुन्ह्याचा किती तळ गाठलाय हेच अधोरेखित होतंय.

## मोकाट 75 कुत्र्यांची झाले लसीकरण ; नागरिकांकडून समाधान व्यक्त

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

शहरात पिसाळलेल्या कुत्र्याने दहशत पसरवली व \ विविध भागात सतरा जणांचे लचके तोडले होते. त्यावेळी ग्रामपंचायतने भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली होती. त्या मागणीला यश आले असून सरपंच सुप्रिया महाडीक व ग्रामविकास अधिकारी यांनी सांगितल्या प्रमाणे सोमवार 28 एप्रिल रोजी शहरातील काही भागातील 75 भटक्या कुत्र्यांची लसीकरण करण्यात आले. शहरात पिसाळलेल्या कुत्र्याने दिवसभर धुमाकूळ घालवत दहशत पसरवली व शहरातील विविध विभागातील साधारण सतरा पेक्षा जास्त लहान मुले व तरुणांना दिसेल तेथे लचके तोडले होते. सदरील कुत्र्याने धुमाकुळ घातल्याने खळबळ उडाली होती.त्यामुळे सदरील पिसाळलेला व मोकाट कुत्र्यांचा बदोबस्त करण्याची मागणी ग्रामपंचायतकडे नागरिकांनी केली होती. त्या मागणीची तात्काळ



दखल घेत सरपंच सुप्रिया महाडिक यांनी शहारातील भटक्या कुत्र्याची लसीकरण मोहीम नागोठणे ग्राम पंचायत, प्राणी संघटना रोहा, व पशुधन अधिकारी पंचायत समिती रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार 28 एप्रिल रोजी सुरु करीत शहरातील बाजारपेठ, कोळीवाडा, मोहल्ला परिसर, कुंभार आळी, मराठा आळी, गवळ आळी, रमाईनगर, इत्यादी ठिकाणी राबवून साधारण 75 भटक्या कुत्र्यांची लसीकरण करण्यात आल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे यांनी दिली. सदरील मोहिमेत सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था रायगड मधील सागर दहींबेकर, प्रयाग बामुगडे, विक्रांत कोंगिले, शशांक दोडामणी, प्रणय शिंदे, विजया मगर, कृतिका वारंगे, श्रावणी भोई, पायल हंभीर, विनय ठाकूर, आनंद मोहिते, प्रणित कोतवाल ग्रामपंचायत कर्मचारी वैभव चितळकर यांनी सहभाग घेतला होता. केलेल्या मागणीनुसार कुत्र्यांचे लसीकरण चालू झाल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करून सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांचे अभिनंदन करीत आहेत.

## अतिवृष्टी झाल्यामुळे शासनाकडून मंजूर झालेले अनुदानाचा अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यावर निलंबित करून कारवाई करावी

### शेतकऱ्याचे अतिवृष्टी चे पैसे खाणारे व खाल्याने आमदार सदाभाऊ खोत यांची मुख्यमंत्री कडे तक्रार

दैनिक युवक आधार
प्रतिनिधी . नामदेव मंडपे
मंठा जालना



महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री. देवेंद्रजी फडणवीस यांना आमदार सदाभाऊ खोत महाराष्ट्र विधान परिषद संस्थापक, रयत क्रांती संघटना, महाराष्ट्र राज्य माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी निवेदन तक्रार दिली आहे की जालना जिल्ह्यातील घनसावंगी, अंबड, भोकरदन व जाफ्राबाद या तालुकामध्ये सन २०२२-२३ मधील अतिवृष्टी झाल्यामुळे शासनाकडून मंजूर झालेलया अनुदानातील अपहाराबाबत सन २०२२-२३ या वर्षी झालेल्या अतिवृष्ट, पुर व गारपीटमुळे जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांना शासनाकडून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले होते. हे अनुदान शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित असताना उपविभागीय अधिकारी अबंड व भोकरदन, तसेच तहसीलदार अबंड, घनसावंगी, भोकरदन, जाफराबाद, तसेच संबंधीत तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांनी खऱ्या लाभार्थीना लाभ न देता बोगस शेतकरी दाखवून त्या शेतकऱ्यांच्या नावे अनुदानाची कोट्यावधी रुपयांचा रक्कम हडप केल्याची प्राथमिक माहिती समोर आलेली आहे. तसेच अंबड व भोकरदन येथील उपविभागीय अधिकारी यांच्यासह अंबड, घनसावंगी, भोकरदन, जाफराबाद या चारही तालुक्यातील तहसीलदारांनी शेतकऱ्यांचे जवळपास ५० कोटींचे सानुग्रह अनुदान बोगसरित्या वाटप केले आहे.यामध्ये बीड,अहिल्यानगर, व बुलढाणा जिल्ह्यातील बोगस शेतकरी दाखवून जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे अनुदानाची रक्कम वाटप केल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यावर मोठा अन्याय झाला आहे. यासंदर्भात रयत क्रांती संघटना, जालना जिल्हा यांनी देखील कार्यवाही होणेबाबत निवेदन दिले आहे. भविष्यात यावर कोणतीही कार्यवाही न झाल्यास रयत क्रांती संघटनेने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तरी, सदर भ्रष्टाचाराच्या प्रकरणामधील संबंधित अधिकारी हे पुरावे मिटविण्यासाठी प्रयत्न करतील, ही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबीत करून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणीआमदार सदाभाऊ खोत सदस्य विधान परिषद संस्थापक रयत क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य माजी मंत्री यांनी मुख्यमंत्री सचिवला केली आहे

## गुड लाईफ केंद्रामध्ये पत्रकार सुरेश भोईर यांचा वाढदिवस केला साजरा

**दैनिक युवक आधार**
**सुरेश भोईर (कार्यकारी संपादक)**

दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी नवीन पनवेल गुड लाइफ आरोग्य केंद्रामध्ये पनवेल,मुंबई,कल्याण, उरण तालुक्यातू नागरिक सकाळी ८ वाजता येतात गुड लाईफ आरोग्य केंद्राचे सल्लागार यांच्या उपस्थित दैनिक युवक आधारचे कार्यकारी संपादक सुरेश भोईर यांचा वाढदिवस केला साजरा

गुड लाईफ मध्ये दररोज येणाऱ्या नागरिकांनी आरोग्याची काळजी कशी घेतली पाहिजे व आहारामध्ये कोणत्या प्रकारचे घटक सेवन केले पाहिजे वेळेवर पाणी पिले पाहिजे वेळेवर झोपले पाहिजे असे अनेक प्रकारचे सल्ले दिले गुड आरोग्य लाईफ केंद्राचे सल्लागार एक चांगल्या प्रकारे माहिती देतात.याचे तंतोतंत पालन करणारे आजारी लोक निरोगी बनण्यासाठी या केंद्रामध्ये येत असतात.

आज गुड लाईफ आरोग्य केंद्राचे सल्लागार यांच्या उपस्थित दैनिक युवक आधारचे कार्यकारी संपादक सुरेश भोईर यांचा केक कापून वाढदिवस साजरा झाला. यावेळी उपस्थित आरोग्य केंद्राचे सल्लागार पारस वंजत्री,हर्षा वंजत्री,विनोद सोळंकी,गजानन कदम,सनीप कलोते,दिपाली पारसकर, मयूर तांबडे,किरण बाथम,रूपाली शिंदे, उजाला शर्मा,राहुल पाल, रजनी बाथम,क्रांती जाधव,अश्विनी मोरे,छोटेलाल वर्मा, सविता वर्मा,राजेश परब,अनिल कदम,कृष्णा म्हात्रे,महेंद्र पवार,अनिशा कदम,आरती भोईर,संदीप भोईर,रंजना भोईर,नयन भोईर,कामिनी म्हात्रे,भीमा म्हात्रे,कीर्ती जाधव,सरिता सोनवणे,मनीषा पवार व सर्व गुड लाइफ केंद्राचे सदस्य निशुल्क सेवा करणारे सेवक व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## जेएनपीटी कामगार एकता संघटनेतर्फे जेएनपीए कलावंत कामगारांचा सत्कार समारंभ संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

सोमवार दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जे एन पी ए मल्टीपर्पज हॉल टाऊनशिप येथे कलावंत कामगारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. जे एन पी टी कामगार एकता संघटनेचे अध्यक्ष व बोर्ड मेंबर मा. दिनेश पाटील यांच्या संकल्पनेतून कामगार कलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कामगार नेते दिनेश पाटील सर हे नेहमीच कामगारांसाठी सकारात्मक व कामगार हितासाठी मेहनत घेत असतात. या कार्यक्रमासाठी देशातील प्रथम क्रमांकाच्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटीचे कर्तुत्ववान आदरणीय अध्यक्ष उन्मेश शरद वाघ (आय आर एस) यांच्या शुभहस्ते जे एन पी ए मधील कलावंत कामगार आणि अधिकारी यांना छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पवित्र स्मृतींना मानवंदना व कामगार एकजूट, बंधुता वृद्धिंगत व्हावी या उद्दिष्टाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती




मनीषा जाधव (महाव्यवस्थापक आणि सचिव) नायडू भास्कर एस (कमांडर) एड. जयप्रकाश सावंत (माजी विश्वस्त) बी. टी.ओवे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक )जी वैद्यनाथन (मुख्य महाव्यवस्थापक) कॅप्टन बाळासाहेब पवार (मुख्य महाव्यवस्थापक) गिरीश थॉमस (मुख्य महाव्यवस्थापक) सुरेश बाबू (मुख्य महाव्यवस्थापक) श्रीमती राजश्री दाबके (महाव्यवस्थापक) अशोक जगताप (सतर्कता अधिकारी )एड. विजय पाटील (कामगार नेते) डॉक्टर वर्षा यादव (वैद्यकीय पर्यवेक्षक) देवानंद पवार (अध्यक्ष एसी एसटी असोसिएशन. ) आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

सुरुवातीस मान्यवरांचे आगमन, स्वागत, करण्यात आले. यानंतर कलावंतांचा सत्कार करण्यात आला.त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम, हास्य प्रबोधनकार शशसंजीवन म्हात्रे यांचे छत्रपती संभाजी महाराज बुद्धी आणि शौर्याची गाथा या विषयावर प्रेरणादायी वकृत्वाने छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा ऐकून उपस्थितांच्या मनात स्फुर्ती जागृत झाली.या कार्यक्रमाचे औचित्य साधून जे.एन.पी.ए. कामगार कलावंतांकडून छत्रपती संभाजी महाराजांना संगीतमय मानवंदना देण्यात आली.रायगड भूषण कुमार पपन पाटील आणि सहकारी यांची छावा चित्रपटातील गीतांवर आधारित चित्तथरारक नृत्याविष्कार सादर झाले,. मणिकर्णिका युद्ध कलापथक नवी मुंबई यांची लाठीकाठी,भाला, तलवारबाजी दांडपट्टा यांची साहसी प्रात्यक्षिके झाली. मान. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथोरिटीचे आदरणीय अध्यक्ष उन्मेश शरद वाघ यांच्या सुविद्य पत्नी लिना मॅडम यांचे सर्व कामगार कलाकारांना प्रोत्साहन पर भाषण झाले.यावेळी जे जे एन पी ए पोर्ट अथॉरिटीचे अध्यक्ष माननीय श्री उन्मेश वाघ यांच्या काही अपरिहार्य कारणामुळे अनुपस्थितीत असल्याने त्यांनी कामगार कलावंतांसाठी दिलेल्या शुभेच्छांचे वाचन लिना मॅडम यांनी केले. जे एन पी ए कामगार एकता संघटनेचे अध्यक्ष माननीय दिनेश पाटील यांनी कामगार कलाकारांच्या कलेचा आदर होण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी असे कार्यक्रम नेहमीच होतील असे आश्वासन दिले त्यानंतर आभार प्रदर्शन झाले स्नेहभोजन समयी जेष्ठ सिने अभिनेता स्वर्गीय मनोज कुमार यांच्या सुंदर गीतांच्या गायनाने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. आदरणीय मा.दिनेश पाटील अध्यक्ष आणि बोर्ड मेंबर जे एन पी ए यांच्या मार्गदर्शनाखाली सुनियोजित आयोजनाने कार्यक्रम सुंदररित्या संपन्न झाला. कार्यक्रमासाठी जेएनपीटी कामगार एकता संघटनेचे सर्व कार्यकर्ते आणि सभासद जे एन पी टी अधिकारी आणि कामगार बंधू भगिनी उपस्थित होते गौरविण्यात आलेल्या कामगार कलावंतांसाठी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन प्रवासावर आधारित असणाऱ्या साहित्यिक शिवाजी सावंत लिखित छावा कादंबरीची सुंदर प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

## उरणात मैदानासाठी कोमसाप कवींचा नवघर गावात जोरदार जागर.



**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

कोकण मराठी साहित्य परिषद, उरण,या शाखेने २८ एप्रिल रोजी नवघर या गावी कवींचा सिडको विरोधात जोरदार लढा देण्याचे कवितांच्या जागरातून दाखविले हा जागर ज्येष्ठ साहित्यिक ए.डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला.यावेळी उद्घाटक ग्रा.पं.सदस्या रंजना पाटील, द्रोणागिरी स्पोर्टसचे अध्यक्ष महादेव घरत, रायगडभूषण प्रा. एल.बी.पाटील प्रा.गजानन चव्हाण,रवी वाजेकर, अविनाश म्हात्रे,जयवंत पाटील, श्वेता राजकुमार ,योगेश तांडेल,राजेश पाटील, अर्चना तांडेल,मोहन भोईर इ.यांची प्रमुख उपस्थिती होती.स्वागत आभार प्रकाश भोईर, प्रास्ताविक शिवेंद्र म्हात्रे, सूत्रसंचालन गंधार पाटील यांनी केले.

कवितांच्या जागरात ए.डी. पाटील,अनिल भोईर, रायगड भूषण किशोर पाटील, भरत पाटील, श्वेता कडू,हेमंत पाटील, संग्राम तोगरे,
जयवंत पाटील यांनी वातावरण तापविणा-या कविता सादर केल्या.आगरीबोलीत प्रा.एल.बी. पाटील यांनी पसायदान सादर केले.

## चाळीसगाव वारकरी संप्रदायच्या कीर्तन मोहोत्सवाची काल्याच्या कीर्तनाने झाली सांगता 2025

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

श्री संत ज्ञानेश्वर मंदिर व ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मातेच्या प्रांगणात नागोठणे विभागाच्या वतीने चाळीस गाव वारकरी सांप्रदायाचे कीर्तन मोहोत्सवाच्या निमित्ताने मिती चैत्र अमावस्या रविवार 27 एप्रिल ते वैशाख शुक्ल 1 सोमवार 28 एप्रिल रोजी हरिनामाचा गजर दूमदुमला असून सदरील पारायण,अखंड हरिनाम व कीर्तन महोत्सवाची सांगता मोठ्या भक्तिभावाने तसेच भागवताचार्य ह.भ.प.भिमरावजी महाराज दराडे शास्त्री, देवाची आळंदी यांच्या काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली. यावेळी नागोठणे विभागासह चाळीस गावातील वारकरी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या धार्मिक कीर्तन मोहोत्सवात रविवार 27 एप्रिल रोजी सकाळी अल्पोहार व 10.00 ते दुपारी 01.00 वा. श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण नववा व बारावा अध्यायाचे वाचन, 01.00 ते 03.00 वाजेपर्यंत प्रकाश (घिसुशेठ) जैन,अमित शेट्ये,हिराजी महाराज शिंदे, प्रशांत भोईर, निखिल मढवी, पांडुरंग शिंदे, कै. बाळु थिटे यांच्या स्मरणार्थ अनंत थिटे,योगेश म्हात्रे यांच्या सहकार्याने महाप्रसाद,सायं. 05.00 ते 07.00 हरिपाठ, सायं.07.00 ते रात्री 09.00 वाजेपर्यंत चाळीस गाव वारकरी सांप्रदाय यांच्या सहकार्याने भागवताचार्य ह.भ.प. भगिरथ महाराज काळे,सिन्नर – नाशिक यांचे किर्तन, रात्री 09.00 ते 11.00 वा. शिवरामभाऊ शिंदे,संजय भोसले,मोरेश्वर तेलंगे,एकनाथ ठाकूर,विजय खाडे,कांचन ठाकूर, ह.भ.प. वसंत भिसे व प्रकाश ज्वेलर्स यांच्या सहकार्याने महाप्रसाद तसेच सोमवार 28 एप्रिल रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 वा. नागोठणे विभाग चाळीसगाव वारकरी संप्रदाय यांच्या सहकार्याने भागवताचार्य ह.भ.प.भिमरावजी महाराज दराडे शास्त्री, देवाची आळंदी यांचे 10.00 ते 12.00 वा. पर्यंत काल्याचे किर्तन,दुपारी 12.00 ते 02.00 वा. उदय जवके,संतोष कोळी,सचिन कळसकर, विनायक गोळे, अतुल काळे,मनोज खांडेकर,सचिन भोसले व ह.भ.प. पांडुरंग रेडेकर यांच्या सहकार्याने काल्याच्या महाप्रसादाने या धार्मिक कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चाळीसगाव वारकरी संप्रदायचे सर्व पदाधिकारी–सदस्य व हरिभक्त यांनी अपार मेहनत घेतली.



# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती विशेष : महाराजांचे विचार व कार्य

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** विसाव्या शतकातील प्रखर राष्ट्रभक्त, समाज सुधारक, अंधश्रद्धा निर्मूलक, जातीभेद न मानणारे, थोर राष्ट्रसंत म्हणजे तुकडोजी महाराज. त्यांनी आपल्या साहित्यातून आणि कीर्तनातून देशभक्ती, अहिंसा आणि आत्मसंयम याची शिकवण आपल्या अनुयायांना दिली. राट्रपतीभवनात झालेले त्यांचे खंजिरी भजन ऐकून भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी तुकडोजी महाराजांना राष्ट्रसंत म्हणून संबोधिले. अशा या महान राष्ट्रसंताची जयंती आपण येणाऱ्या ३० एप्रिल रोजी साजरी करत आहोत त्यानिमित्ताने हे शब्दपुष्प.


तुकडोजी महाराज यांचे मूळ नाव माणिक बंडोजी इंगळे. त्यांच्या वडिलांचे नाव बंडोजी तर आईचे मंजुळाबाई होते. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली या गावी झाला. आडकोजी महाराज हे त्यांचे गुरू त्यांनी त्यांचे मूळचे माणिक हे नाव बदलून तुकडोजी असे ठेवले. विदर्भात त्यांना मोठ्या प्रमाणात मानणारा वर्ग असला तरी महाराष्ट्रभरच नाही तर देशभर हिंडून त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन दिले. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. तसेच सन १९४२ च्या भारत छोडो आंदोलनादरम्यान काही काळ त्यांना अटक सुद्धा झाली होती. त्यावेळी 'आते है नाथ हमारे' हे त्यांनी रचलेले पद स्वातंत्र्यलढ्यासाठी स्फूर्तिगान ठरले होते.

त्यांची अनुभवसागर भजनावळी, राष्ट्रीय भजनावळी, सेवास्वधर्म, ग्रामगीता इत्यादी पुस्तके प्रसिद्ध आहेत. या पैकी ग्रामगीता ग्रंथाला वाचकांनी आदराचे स्थान दिले आहे. त्यात त्यांनी अस्पश्यता निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, भेदाभेद, शिक्षण, स्वच्छता, सर्वधर्मसमभाव, राट्रभक्ती याविषयी जागृतीचे आव्हान लोकांना केले आहे, जणू त्यांना म्हणायचे होते,

*माझ्या झोपलेल्या पिढ्या मला जागायला पाहिजे, सूर्य झोपतो का कधी अस वागायला पाहिजे...*

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या भजनातून दारू पिवू नका, जाती भेद पाळू नका, अस्पृश्यता गाडून टाका, देशा वर प्रेम करा असा उपदेश करायचे. प्रत्येक भजनाच्या प्रारंभी थोडे गुरु स्मरण व नंतर अंधश्रद्धा, वाईट रूढी, व्यसने यांचा त्याग करा अशा आशयाचे थोडा वेळ भाषण केले की, हातातील खंजिरी च्या वेगवान ठेक्यावर त्यांचे पहाडी आवाजातील सुंदर चालीतील मराठी–हिंदी पदांचे भजन सुरु होई व त्यात कुठल्याही धर्मातील पंथातील श्रोता तल्लीन होवून जाई.

ग्रामगीता ग्रंथाचे लेखन हा त्यांच्या जीवनकार्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. भारत हा खेड्यांचा देश



आहे, हे लक्षात घेऊन ग्रामविकास झाला की राष्ट्राचा विकास होईल, अशी तुकडोजी महाराजांची विचारसरणी होती. त्यामुळेच तुकडोजी महाराज ग्राम गीतेत लिहतात,

*देश हा देवची पवित्र, कायदा त्याचे व्यवस्था सूत्र... भारतातील खेड्यांच्या स्थितीची त्यांना पुरेपूर कल्पना होती. त्यामुळे त्यांनी ग्रामविकासाच्या विविध समस्यांचा मूलभूत स्वरूपी विचार केला व त्या समस्या कशा सोडवाव्यात, याविषयी उपाययोजनाही त्यांनी ग्रामगीतेत सुचविल्या. गावाविषयीची जी उपाययोजना तुकडोजी महाराजांनी सुचविली ती अतिशय परिणामकारक आहे. त्यांच्या मते ग्राम हे सुशिक्षित व्हावे, सुसंस्कृत व्हावे, ग्रामोद्योग संपन्न व्हावेत, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात, ग्रामोद्योगांना प्रोत्साहन मिळावे, प्रचारकांच्या रूपाने गावाला नेतृत्व मिळावे, असा त्यांचा प्रयत्न होता.

सर्वधर्मसमभाव या विचारसरणीचे ते राष्टसंत होते. त्यासाठी तुकडोजी महाराजांनी सामुदायिक सर्वधर्मीय प्रार्थनेचा पुरस्कार केला. एकेश्वरवादाचा पुरस्कार तुकडोजी महाराजांनी आपल्या कीर्तनातून केलेला दिसून येतो. संत कसा असावा या बदल ग्रामगीता या ग्रंथात तुकडोजी महाराज म्हणतात,

संत देहाने भिन्न असती।
परि ध्येय धोरणाने अभिन्न स्थिती।
साधने जरी नाना दिसती।
री सिद्धान्तमति सारखी।।

धर्मातील अनावश्यक कर्मकांडाला त्यांनी फाटा दिला होता. देवभोळेपणा, जुनाट कालबाह्य अंधश्रद्धा नाहीशा व्हाव्यात, याविषयी त्यांनी अविरत प्रयत्न केले. देशातचे तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृत कसे होतील, याविषयीचे उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन तुकडोजी महाराजांनी केले. तसेच तरुणांच्या व्यसनाधीनतेचाही तीव्र निषेध करतांना ते लिहतात,

उठरे उठ तरुणा देहात, झाला गर्क कसा तू व्यसनात..

महिलांची उन्नती हा सुद्धा तुकडोजी महाराजांच्या विचारविश्वाचा एक लक्षणीय पैलू होता. कुटुंबव्यवस्था, समाजव्यवस्था, राष्ट्रव्यवस्था ही स्त्रीवर कशी अवलंबून असते, हे त्यांनी आपल्या कीर्तनांद्वारे समाजाला पटवून दिले. एक चांगली आईच देशाचा उत्तम नागरिक घडवू शकते. इंग्रजीत म्हटलेलं आहेच, One mother is better than a thousand school teachers. त्यामुळे स्त्रीला अज्ञानात व दास्यात ठेवणे राष्ट्रासाठी कसे अन्यायकारक आहे, हे त्यांनी अत्यंत प्रभावीपणे पटवून दिले.

ऐहिक व पारलौकिक यांचा सुंदर समन्वय तुकडोजी महाराजांच्या साहित्यात झाला आहे. त्यामुळेच ते त्यांच्या प्रसिद्ध अभंगात म्हणतात..

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या॥
भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या॥

अशा ह्या महान राष्ट्रसंताने मराठीप्रमाणेच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले आहे. आयुष्याच्या शेवटापर्यंत त्यांनी आपल्या प्रभावी खंजिरी भजनाच्या माध्यमातून त्यांना अभिप्रेत असलेल्या विचारसरणीचा प्रचार करून आध्यात्मिक, सामाजिक, राष्ट्रीय प्रबोधन केले. शेवटी ११ ऑक्टोबर १९६८ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचे विचार व कार्य आजही समाजाला मार्गदर्शन करणारे आहे,त्यांच्या या महान कार्यास शतशः प्रणाम.

**लेखकः डॉ. रमेश देविदास काळे (सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालय पालोद)**

## महाराष्ट्र गौरव रथयात्रेचे वाकण नाका येथे जोरदार स्वागत

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मंगळवार 29 एप्रिल रोजी सायंकाळी 04.00 वाजता महाराष्ट्र गौरव यात्रेचे रोहा तालुक्यातील वाकण नाका येथे फटाक्यांच्या आताषबाजीत स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश, कोंकण विभाग महाराष्ट्र गौरव रथयात्रेची सुरुवात रविवार 27 एप्रिल रोजी कसबा संगमेश्वर (छ. संभाजी महाराज स्मारक) येथुन सकाळी 09.00 वा. करण्यात आली. सदरील यात्रा रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील प्रमुख व ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वास्तु व ठिकाणांचे पावित्र्य जपत छत्रपती शिवरायांच्या पावन रायगड जिल्हाच्या भुमीत मंगळवार 29 एप्रिल रोजी आली असता कोलाड येथे या गौरव रथयात्रेत रोहा तालुक्याची जिवनदायीनी असलेल्या पवित्र कुंडलिका नदीचे जल तसेच ग्रामदैवत श्री धाविर महाराज मंदिर व स्वतंत्र भारताचे पहिले अर्थमंत्री स्व.सी.डी.देशमुख, स्व. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्मृती स्थळांची मृत्तिका व घोसाळगड, अवचितगड येथील ऐतिहासिक नजराणे या गौरव रथयात्रेत अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सदरील रथयात्रेचे वाकण नाका येथे शिवराम शिंदे, दिलीप टके, हरिष काळे,संतोष कोळी,बाळा टके, सचिन कळसकर, अतुल काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत फटाक्यांच्या आताषबाजीत जोरदार स्वागत करण्यात आले.यावेळी आशा शिर्के,अमिता शिंदे,सुजाता जवके,पूनम काळे,सुनीता तटकरे,जुगन जैन, बिपीन सोष्टे,श्रीकांत रावकर, दिपेंद्र आवाद,प्रभाकर ठाकुर,चेतन टके, रोशन पारंगे, गोरख पारंगे तसेच रोहा येथील मयुर दिवेकर,गोरख पारंगे, महेश कोल्हटकर, समाधान शिंदे, महेश नागावकर यांच्यासह विभागातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी सहा. पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# बांद्रा शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांतर्फे सरकारचे आभार मानण्यासाठी सभा संपन्न

## मा.आ.श्री.किरण पावसकर ( शिवसेना सचिव/प्रवक्ते) यांनी उपस्थित सर्व रहिवासी कर्मचाऱ्यांना केले मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

शासकीय वसाहत,बांद्रा (पूर्व) येथे गव्हर्नमेंट कॉटर रेसिडेन्शियल असोसिएशन यांनी सरकारचे आभार मानण्यासाठी तसेच सन्मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेबांचे आभार मानण्यासाठी मोठ्या उत्साहात कर्मचाऱ्यांची सभा शनिवारी पार पडली. या सभेला मा.आ.श्री.किरण पावसकर ( शिवसेना सचिव/प्रवक्ते) यांनी उपस्थित सर्व रहिवासी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.गेल्या दोन पिढ्या येथे कर्मचारी राहत असून सरकारची सेवा करत आहेत.येथील कर्मचाऱ्यांनी अनेक वेळा उपोषणे ही केली होती,अनेक वर्षापासून येथील कर्मचारी स्वतःच्या मालकीची घरे मिळण्यासाठी लढा देत आहेत.तसेच माजी मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब यांच्या समवेत अनेक बैठका करण्यात आल्या होत्या. कॅबिनेटमध्ये हा मुद्दा घेण्यात आला आणि बांद्रा शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना भूखंड देण्यात येत आहे,यावर शिक्कामोर्तब झाला व शासन निर्णय काढण्यात आला.तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी येथील कर्मचाऱ्यांना शब्द दिला होता की, येथील कर्मचाऱ्याने शासकीय वसाहत बांद्रा येथेच स्वतःची मालकीचे घर मिळतील आणि हे काम एका बाळासाहेबांच्या शिवसैनिकांने पूर्णत्वास नेण्याचे काम केले,असे पावसकर यांनी



आपल्याभाषणात स्पष्ट केले.तसेच महाराष्ट्र राज्याचे सन्मा. उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे साहेबांचा आपल्याला निरोप आहे, हे काम करून पूर्णत्वास न्यायचे आहे.त्यासाठी एकजूटीने रहा,काम करा.अर्हता व निकषासाठी गठीत होणा–या समितीत चर्चेच्या अनुषंगाने आपले आतापर्यंत कार्यरत अधिकारी/कर्मचारी, सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी व वारसाहक्क यांची प्रतवारीनुसार माहिती तयार करा.याच अनुषंगाने जेवढे लाभ घेता येतील त्याचा अभ्यास करा. असोसिएशनच्या अध्यक्षांनी श्री. एकनाथजी शिंदे साहेब मुख्यमंत्री असताना बांद्रा वसाहतीतील कर्मचाऱ्यांना स्वतःच्या मालकीची घरे मिळवून देण्यासाठी कामाला चालना व गती दिल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियाकडून साहेबांचे मनपूर्वक आभार मानण्यात आले.या सभेला सन्मा.पावसकर साहेबांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे साहेब आणि उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार साहेबांचे सर्व कर्मचाऱ्यांकडून आभार मानण्यात आले. या सभेला कर्मचारी मोठ्या संख्येने कुटुंबासहित उत्साहाने उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिकेची व्यापक वृक्षारोपणासाठी वृक्ष लागवड समितीची स्थापना

### पावसाळ्यात महापालिका मोठ्या प्रमाणात वृक्षरोपण मोहिम राबविणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

'माझी वसुंधरा' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली असून, शहरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. बदलत्या हवामानाचा परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आज मुख्यालयात अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकित वृक्ष लागवड समिती स्थापन करण्यात आली. यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, पाणी पुरवठा विभाग प्रमुख विलास चव्हाण, चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी, पर्यावरण विभागाचे विभाग प्रमुख मनोज चव्हाण, उद्यान विभागाचे अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.माननीय आयुक्त महोदयांच्या निर्देशानूसार येत्या पावसाळ्यात महापालिका कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यात येणार आहे.या उपक्रमासाठी महापालिकेने विविध विभागांशी समन्वय साधत एक सुसंगत कृती आराखडा तयार केला आहे. यामध्ये विविध विभागांना त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. या बैठकित विविध विभागाच्या उपायुक्तांनी सूचना सांगितल्या, या सूचनांप्रमाणे पुढील आठवड्यात प्रेझेंटेशन सादर करण्याबाबत उद्यान विभागास अतिरिक्त आयुक्तांनी सूचित केले. वृक्षारोपणासाठी वृक्ष लागवड समितीची अंतर्गत विविध विभागांना सोपविण्यात आलेली जबाबदारी जागा निवड (नगर रचना व उद्यान विभाग) : वृक्षारोपणासाठी योग्य जागांची निवड करणे. झाडांची निवड (पर्यावरण विभाग) : स्थानिक हवामान व मातीच्या गुणधर्मानुसार योग्य जातींची झाडे निवडणे. खड्डे खोदणे (बागायती विभाग) : झाडे लावण्यासाठी खड्ड्यांचे खोदकाम करणे. झाडे लावणे व देखभाल (उद्यान विभाग) : झाडे लावणे, कुंपण घालणे, संरक्षक व्यवस्था करणे आणि पाणी देण्याची जबाबदारी. नागरिक जनजागृती (पर्यावरण विभाग) : लोकांपर्यंत वृक्षारोपणाचे महत्त्व पोहोचवणे व सहभागासाठी प्रोत्साहित करणे. वृक्ष निधी (सीएसआर फंड विभाग व लेखा विभाग) : वृक्षारोपणासाठी निधी उभारणे व खर्चाचे व्यवस्थापन. पाण्याची तरतूद (पाणी पुरवठा विभाग) : लावलेल्या झाडांना नियमित पाणी मिळण्यासाठी उपाययोजना करणे. महापालिकेने सर्व संबंधित विभाग प्रमुख व अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची यादी पाठवून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे पुणे शहराच्या हरित पट्ट्याचा विस्तार होऊन पर्यावरणीय समतोल साधण्यास मदत होणार आहे.

# या जगण्यावर शतदा प्रेम करावे...

## जेष्ठ पनवेलकरांसोबत पनवेल मनपाचा संवाद मेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

जेष्ठ पनवेलकर अर्थातच सिनीअर सिटीजन यांच्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून दि. २९ रोजी ज्येष्ठ पनवेलकर संवाद स्नेह मेळावा व प्राथमिक आरोग्य तपासणी शिबीर तसेच सेवा हमी हक्क कायदा जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात वडाळे तलाव येथे सुर्योदयाच्या साक्षीने संपन्न झाला.

आमदार विक्रांत पाटील

सकाळी 6 ते 8.30 या दरम्यान झालेल्या संवाद मेळाव्याचे उद्घाटन आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते नटराजपूजन करून करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले, जेष्ठांचे आर्शिवाद हिच खरी लढण्याची ताकद आहे. मी या प्रभागातून प्रथम नगरसेवक म्हणून निवडून आलो. जेष्ठांचे आर्शिवाद मला मिळाले, तोच हा वडाळे परीसर.त्यांना कधीही विसरता येणार नाही त्यांच्या आशीर्वादामुळे मुळेचआज मी विविध जबाबदारी पार पाडत विधान परिषदेचा आमदार झालो आहे.

आपल्या प्रास्ताविकात परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी सांगितले की, जेष्ठ नागरिक हा मनपाचा महत्वाचा घटक आहे. त्यांच्याप्रती महापालिकेची





भूमिका सदैव कर्तव्यप्रधान अशीच आहे. संवाद मेळावा सारख्या आगळया वेगळया उपक्रमातून त्यांच्याशी संवाद साधत सदिच्छा मिळविण्याचा प्रयत्न महापालिकेने केला आहे.

तसेच सेवा हक्क विषयी जनजागृती करताना त्यांनी सांगितले की, महापालिकेच्यावतीने लवकरच सेवादूत योजना राबविण्याचे नियोजन केले जात आहे. ज्यामुळे पनवेलकर नागरिकांना अधिक चांगला लाभ मिळेल.

**प्राथमिक आरोग्य तपासणी**

या कार्यक्रमात मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. रक्तातील साखर, हिमोग्लोबिन, थायरॉईड टेस्ट, लिपिड प्रोफाइल, लिव्हर फंक्शन टेस्ट, किडनी फंक्शन अशा विविध चाचण्या या आरोग्य शिबिरात करण्यात आल्या. यावेळी डॉ. गोसावी यांनी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दुपारी 2 ते4 ही वेळ जेष्ठ नागरिकांसाठी राखीव असल्याची महिती दिली. तसेच सर्व आरोग्य केंद्रामध्ये विविध चाचण्या, नियमित आरोग्य तपासण्या करण्यात येत आहेत याचा लाभ जेष्ठ नागरिकांनी घ्यावा, अशी विनंती केली. या आरोग्य तपासणी शिबीराचा सुमारे 141 जेष्ठ नागरिकांनी लाभ घेतला.

**मनमुराद आनंद**

अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात जेष्ठ पनवेलकरांनी तरुणाईला लाजवेल अशा उत्साहात वय, देहभान विसरून कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. या वेळी सादर करण्यात आलेल्या ' जिंदगी कैसी ही पहेली हाय' या गाण्यावेळी जेष्ठांनी आकाशात फुगे सोडून आपला आनंद व्यक्त केला. मराठी,हिंदी गाण्यावरती त्यांनी आपल्या जोडीदारांसोबत, मित्रांसोबत, मैत्रिणीसोबत नृत्य करून आजचा 'आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस' साजरा केला.

या कार्यक्रमांतर्गत सर्व उपस्थित जेष्ठ पनवेलकरांना भेटवस्तू देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले. यावेळी सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे संयोजन शुभा जोशी व अजितेम जोशी यांनी केले तर गायक दत्ता मेस्त्री व गायिका पौर्णिमा काकडे, स्वाती हरवंदे यांनी गाणी सादर केली. या कार्यक्रमाचे संगीत संयोजन किशोर नागरे तर निवेदन मंदार खराडे यांनी केले.

## वाशिम जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांना आकस्मिक भेटी कामचुकार कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले.



**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार.**

गैरहजर कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस. तपासणी मोहिमेमुळे कर्मचारी अलर्ट कुणाचीही गय न करण्याचा इशारा नाहीतर कठोर कारवाई.

वाशिम जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांना आकस्मिक भेटी देण्याची मोहीम जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने सुरू केली आहे. या मोहिमेत गैरहजर आढळलेल्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जात असून का काम चुकार कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. अंगणवाडी केंद्रात मुलांना पूर्व प्राथमिक शिक्षणाचे धडे दिले जातात. तसेच स्तनदा माता व मुलांना पोषण आहारही पुरवला जातो जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमातून अंगणवाडी केंद्राचे इमारती बोलक्या झाल्या. अंगणवाडीतील मुलांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी सर्वांनी तत्पर राहावे अशा सूचनाही त्यांनी दिल्या. त्यानुसार कामकाज सुरू आहे. किंवा नाही दैनंदिन नोंदवही अद्ययावत आहेत किंवा नाही तसेच कार्यालयीन वेळेत कर्मचारी कर्तव्यावर असतात किंवा नाही त्याची पडताळणी म्हणून महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर यांनी आकस्मिक भेटीची मोहीम हाती घेतली शनिवारी दिनांक 26 एप्रिल रोजी मालेगाव तालुक्यातील काही अंगणवाडी केंद्रांना भेट दिली असता एक दोन ठिकाणी अंगणवाडी सेविका गैरहजर आढळून आल्या. अंगणवाडी केंद्रात अस्वच्छता तसेच बालकांची उपस्थिती ही अल्प आढळून आली. याची गंभीर दखल घेत तातडीने कामकाजात सुधारणा करण्याचे निर्देश दिले. यावेळी बाल विकास प्रकल्प अधिकारी मदन नायक यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## बधीत कर्मचारी आणि नेते संतोष पवार यांचे 1 मे रोजी अमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण नगरपरिषदे मधील कंत्राटी कामगारांना ठेकेदारांनी नोकरी मधून कमी केल्या बद्दल आणि कायम आस्थापने वरील सफाई कामगारांच्या वारसांना वारस हक्कने नोकरी मिळण्यासाठी विनाकारण दिरंगाई होत असल्या मुळे कामगारांचे भरून न येणारे नुकसान टाळण्या साठी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून कामगार नेते संतोष पवार आणि सर्व बधीत कामगार 1 मे 2025 पासून उरण नगर परिषदेच्या प्रवेश व्दारावर आमरण उपोषण करणार आहेत.यासंदर्भात म्युनिसिपल एम्पलॉइज युनियनच्या वतीने उपजिल्हाधिकारी रायगड व जिल्हाप्रशासन अधिकारी नगरपालिका शाखा,रायगड, अलिबाग यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात त्यांनीसंदर्भ देतनाम्हटले आहेंकी उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळकेयांच्या समवेत 22 एप्रिल 2025रोजी कंत्राटीकामगारांच्या प्रश्नावर झालेली सकारत्मक चर्चा,मा.उच्चन्यायालय –औरंगाबाद खंडपिठाचेदि.8 जानेवारी 2025चे आदेश,मा.सामाजिक न्यायव विशेष सहाय्यविभाग,मंत्रालययांचे दि.28जानेवारी 2025 व सन 2024-25मध्ये या अनुषंगाने दिलेले मार्गदर्शक आदेश. मा.आयुक्त तथा संचालकमनोज रानडे यांनी दिलेले 21फेब्रुवारी 2025 सुस्पष्ट आदेश हे सारे संदर्भ असताना




सुद्धात्यानंतर अनेक पत्रव्यवहार करूनही गेली 2 वर्षा पेक्षा अधिक कालावधी गेल्याने कोणतेच निष्पन्न निघाले नाही. त्यामुळे 22 एप्रिल2025 रोजी खोपोली,कर्जत,आणि उरणच्या कंत्राटी कामगारानी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे उपोषण केले होते, त्यानंतर कर्जत-खोपोली येथील कामगार 23 एप्रिल2025 रोजी कमावर हजार झाले मात्र उरण येथील कामगारांना कामावर घेण्यात आले नसल्याने दि.23 एप्रिल 2025 पासून सदरचे कामगार उरण नगर परिषदेच्या प्रवेशव्दारावर उपोषणास बसले आहेत. जर का या कामगारांना योग्य न्याय मिळाला नाही तर सदरचे कामगार व त्यांच्या समवेत त्यांचे नेते संतोष पवार 1 मे 2025 पासून अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले असून त्यामुळे कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झला तर त्या मुख्याधिकारी तथा प्रशासक समीर जाधव आणि उरण नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहणार असल्याचे ही निवेदनात म्हटले आहे.

## डॉ. पुरुषोत्तम वायाळ व बालाजी ढोबळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर....

**दैनिक युवक आधार**
**परतूर - जालना (अशोक ठोके)**

छत्रपती संभाजीनगर येथील समर्थ सेवा समुहाच्या वतीने तालुक्यातील वाटूर येथील प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ व परतूर येथील पत्रकार बालाजी ढोबळे यांना ' मराठवाडा भूषण समर्थ गौरव ' हा




राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. जलतारा हा महत्वाकांक्षी प्रकल्प प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धी आणण्याचा कसोशीने प्रयत्न करत असल्याबद्दल प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांना तर बालाजी ढोबळे यांना वर्तमानपत्राच्या माध्यमातून सातत्याने प्रेरणादायी व लोकोपयोगी तसेच सकारात्मक वृत्तलेखनाचा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. येत्या 1 मे रोजी महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित एका कार्यक्रमात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

## आज इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे ह.भ.प.माधव महाराज डाके (काठवडेकर) यांचे हरी किर्तन.

### भाविक भक्तांनी लाभ घ्यावा. - डॉ. राजेंद्र सानप

**दैनिक युवक आधार**



**पाटोदा (प्रतिनिधी) -** श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ महाराज प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड येथे गेल्या १३ वर्षापासुन दरवर्षी अखंड त्रिदिवशीय हरीनाम सोहळ्याचे आयोजन करण्यात येते या ही वर्षी मुर्ति प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिना निमित्त ३० एप्रील-२०२५ ते २ मे २०२५ या कालावधीत अखंड त्रिदिवशीय हरीनाम सोहळ्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्यात दिनांक ३० एप्रिल २०२५ बुधवार रोजी रात्री- ८:३० वाजता प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प.माधव महाराज डाके (काठवडेकर) यांचे सुश्राव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या किर्तनाचा लाभ शहारातील परीसरातील सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीडचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप यांनी व त्यांच्या सर्व सहकारी भाविक भक्त यांनी केले.

## ..चिंकुद्रा येथील कुलदैवत श्री.भैरवनाथ यात्रेनिमित्त लावणी खाणी चे कार्यक्रमाचे उद्घाटन..

**दैनिक युवक आधार**
**संतोष पुदाले संपर्क --९७६५८०१२७२**
**तुळजापूर विधानसभा २४१( धाराशिव**

तुळजापूर तालुक्यातील चिंकुद्रा येथील कुलदैवत श्री.भैरवनाथ यात्रेनिमित्त दि. २६ एप्रिल रोजी श्रीमंत राजे युवा प्रतिष्ठानच्या वतीने पुणे येथील खुशी शिंदे पुणेकर यांचा बहारदार असा लावणीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमंत राजे युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष आप्पाभाई गरड युवानेते प्राध्यापक संजय मोटे प्रमुख पाहुणे नळदुर्ग शिवसेना शहर प्रमुख संतोष पुदाले सरदार सिंग ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी चिंकुद्रा येथील कुलदैवत श्री.भैरवनाथ यात्रा कमिटीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड व उपाध्यक्ष अमोल मोटे सदस्यांच्या हस्ते आलेल्या मान्यवराचे फेटे मारून सत्कार करण्यात आले यावेळी माजी सरपंच राजाभाऊ गरड संतोष मोटे बालाजी गायकवाड ज्योतीराम मोटे नळदुर्ग उपशहरप्रमुख शाम कनकधर युवा सेना शहर प्रमुख नेताजी महाबोले, शाहूराज गायकवाड, शंकर मोटे, युवा सेना सहदेव गरड, दादा मोटे, शाखा प्रमुख संतोष मोटे चिंकुद्रा गावातील ग्रामस्थ सर्व मान्यवर उपस्थित होते



## सौ अनिता गवळी मॅडम सोलापूर यांना समाजसेविका पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**कवी सरकार इंगळी**



सौ.अनिता गवळी मॅडम या सोलापुर शहरातील मुख्य रहिवाशी असून त्यांची समाजभर धडाडीच्या अन आघाडीच्या सामाजिक महिला कार्यकर्त्या म्हणून ओळखल्या जातात! सामाजिक बांधिलकी म्हणून त्या नेहमी सामाजिक कार्यकर्ते मेळाव्यातून समाज प्रेरणादायी कार्य करत आहेत त्यामुळे त्यांची प्रेरणासखी महिला कार्यकर्त्या म्हणून विशेष ओळख असून त्यांना "राष्ट्रमाता जिजाऊ प्रेरणा पुरस्कार" हा स्वाभिमानी सार्वजनिक वाचनालय, इंगळी याचे सर्वाश्री श्री विलास पाटील(कवी सरकार) द्वारा जाहीर करण्यात आला असून त्यांना हा पुरस्कार 24 व्या साहीत्य संमेलन अन पुरस्कार सोहळ्यात प्रदान करण्यात येत असल्याने त्यांचे सर्वत्र विशेष कौतुक होत आहे !!

## ज्याच्यावर अन्याय झाला तोच दोषी !

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

वरील शीर्षकावरून वाटत असेल की हे शीर्षक का असे ? पण आज समाजा मध्ये हीच स्थिती आहे . खूप छोट्या गोष्टी पासून तर खूप मोठ्या गोष्टी पर्यंत आपल्याला या स्थितीचा अनुभव होत असतो त्यातीलच एक अनुभव माझा , एक घटना घडली माझा लॅपटॉप चोरीला गेला . तेही अगदी एक तासामध्ये त्याची मी एफ आय आर केली आणि त्याची काय ती विचारपूस पोलीस करत होती पण त्याचवेळी मला वारंवार बोलण्यात येणाऱ्या गोष्टी म्हणजेच " तुला सांभाळून ठेवता नाही आलं काय ?" "असं कसं कोणी आपली वस्तू अशी कुठेही ठेवतात ?" मी कितीतरी सांगून चुकले की मी नाश्ता करायला गेले होते मुली होत्या रूममध्ये तरीही मलाच प्रश्न , मलाच प्रश्न का विचारले गेले मलाच दोषी का ठरवलं गेलं, खरं तर मला असं वाटतं की दोष आपल्या मनुष्यामध्ये आणि समाजामध्ये आहे . काहीही वाईट घटना घडली की ज्याचावर अन्याय झाला आहे तोच आधी गुन्हेगार बनवून जातो त्यालाच आधी स्वतःला निर्दोष साबित करावं लागतं असतं मग बाकीचं जो तो खरा गुन्हेगार आहे त्याच्याकडे लक्ष दिल जात खरंतर म्हणून गुन्हे आता खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहेत मुलीवर अत्याचार झाला तर आधी तिलाच दोषी ठरवलं जात , कुणाचा खून झाला तर आधी त्याला विचारलं जावं की तुला माहिती होतं ना त्या व्यक्तीच्या मनामध्ये तुला मारण्याचा कट चाललेला होता मग तू का घराबाहेर पडलास ? असा प्रश्न खून झालेल्या व्यक्तीला सुद्धा विचारला जाऊ शकतो आणि त्याला सुद्धा असं बोलून आधी दोषी ठरवलं जाऊ शकतं.

जेव्हा समाजामध्ये अन्याय झालेला व्यक्तीस गुन्हेगार म्हणून गणला जातो तेव्हा त्या समाजामध्ये त्याला खरा न्याय मिळेल की नाही सांगता येत नाही पण याच समाजातील माणसांमध्ये ही वृत्ती आली तरी कशी असेल हा प्रश्न आहे ना मग हे दिसतं की जर तुम्ही ज्या व्यक्तीवर तुम्ही अन्याय कराल आणि त्यालाच गुन्हेगार म्हणून असे उभे कराल तर तो या परिस्थितीमध्ये स्वतः ला गुन्हेगार मानेल आणि तुमच्यासमोर न्याय मागणार नाही , तुम्ही त्याच्या न्यायाचे त्याच्याच हाताने खच्चीकरण केले आणि याची त्याला जाणीवही होणार नाही .जर विचार केला तर बऱ्याच ठिकाणी बऱ्याचदा अन्याय होतो पण तो पुढे येत नाही कारण हेच असतं की , कठीण असतं ज्याच्यावर अन्याय झाला त्याला न्याय मिळवून देणं आणि सोपं असतं ज्याच्यावर अन्याय झाला असेल त्यालाच आधी गुन्हेगार किंवा दोषी ठरवन आणि यात दुसरी कसलीच मेहनत लागत नाही आज समाजामध्ये बऱ्याच गोष्टी होत आहेत ज्या वाईट आहेत . माणसाची माणुसकी मरत चालली आहे . वाईट माणसं आणखी वाईट होत चालली आहेत . मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे समाजात राहून तो घडतो त्या समाजाने त्याला घडविले असते आणि त्याच समाजातील चांगले वाईट जे ही काही संस्कार त्याच्यावर पडतात त्यातूनच माणूस घडतो समाज हा माणसाचा आरसा असतो पण आज तोच मनुष्य या समाजाला एक एक करून कलंकित करत चालला आहे आणि त्याच मनुष्याची वाह - वाही केली जात आहे. मनुष्याने स्वतःच्या प्रगतीमध्ये वर्ष घातली . आणि ही गोष्ट काही एकाच व्यक्तीने केलेली नाही तो मनुष्याचा एक गटसमूह होता. तर त्या समूहात असणाऱ्या सोबतच्या लोकांच्या सहकार्याने आज मनुष्य प्रगतीच्या पथावर आहे . यामुळेच आपण मागच्या पिढीतून आजच्या पिढीमध्ये आलेलो आहोत . आणि आज जर आपण आपला समाज अशा प्रकारे घडविला, ज्या समाजात फक्त दुःख , कलह अविश्वास , स्वार्थ, मोह , लालसा आणि एक दुसऱ्याला मागे ओढण्याचा प्रयत्न आपण सतत करत असून तर अशा समाजाची प्रगती कशा प्रकारे येऊ शकते आणि या सर्व गोष्टी वाईट गोष्टी मोठ्या मोठ्या होताना दिसतात त्या गोष्टी समाजाच्या विकासामध्ये कुठेच भाग घेत नाही असा समाज ढासाळण्याच्या मार्गावर असतो आपल्या सर्वांना माहिती असतं काय योग्य काय अयोग्य तरी आपण योग्य गोष्टी करत नाही याचा पुढे काय परिणाम होईल याचा विचार न करता आता यानंतर येणाऱ्या पिढीला आपण आणखीच नैतिक मूल्यांनी खचलेला समाज देत आहोत या सर्व गोष्टींचा आपण विचार करत नाही . आपण स्वतःला जातीमध्ये , धर्मामध्ये आणि काय त्या रंगांमध्ये विभागलेला आहे . मनुष्य हा सामाजिक प्राणी असला तरी आज तो त्याच मनुष्यांना आपल्या पुढे जाऊ देत नाही आहे . आणि या सर्व गोष्टी त्या समाजाचा विकास थांबवतात आज आपल्याला आपल्या समाजामध्येही या सर्व गोष्टी होताना दिसत आहेत यासाठी आपण काही करत आहोत का याचा विचार करण महत्त्वाचा आहे दुसऱ्याला दोष देणं हा जसा सोपा मार्ग आहे तसाच तो खरच दोषी आहे का त्याला समजणं त्याला न्याय मिळवून देणे तितकाच कठीण आहे पण ती कठीण काम आज आपण करत नाहीत त्या कामाला हातात घेण्यास आपण उत्सुक नाहीत आपला समाज आता झोपलेला आहे त्यामध्ये त्या समाजाला असं वाटतं. जे समोर दिसतं तेच खरं असं त्याला वाटतं पण असं का हा प्रश्न तो करत नाही आता प्रश्नच पडत नाही लोकांना प्रश्नच पडत नाही पण का पडत नसतील या प्रश्नाचे उत्तर नाहीत !!

## साडे सतरा गुंठे जमीन प्रामाणिकपणे परत

### सोमठाणे येथील धोक्रट कुटुंबाचा समाजापुढे आदर्श

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

सिन्नर तालुक्यातील सोमठाणे येथील गोदावरी उजव्या कालव्या लगत मधुकर सूर्यभान धोक्रट यांची 282 गट नंबर मध्ये साडेदहा एकर जमीन आहे. त्या जमिनीलगत 283 व व 284 हे छोटे भूमापन गट असून सोमठाणे येथील रामेश्वर सोपान कोकाटे व ज्योती रामेश्वर कोकाटे या पती-पत्नीच्या नावावर साडेसहा एकर जमीन आहे. जमीन मोजणी मध्ये साडे सतरा गुंठे क्षेत्र जादा आल्याने ते लगतच्या शेतकऱ्यास प्रामाणिकपणे परत करण्यात आल्याची घटना सोमठाणे येथे घडली आहे. धोक्रट कुटुंब त्यांच्या व्यवसायामुळे पूर्वी अनेक वर्षे हि शेती वहिवाटी जमीन करत नव्हते. त्यामुळे ही सर्व शेती 15 ते 20 वर्षे पडीक होती. मेंढी शिव रस्त्यालगत ही जमीन आहे .जमिनीची वहिवाट नसल्यामुळे सर्व गटातील बांध वेडेवाकडे झाले होते त्यामुळे त्या क्षेत्रातील निशाणी दिशा बांध वाटा या काही समजत नव्हत्या. त्यामुळे कोणाचे क्षेत्र कोणाकडे आहे हे समजण्यास वाव नव्हता. त्यामुळे याची खात्री करण्यासाठी कोकाटे यांनी जमीन मोजणी करून घेतली. या जमिनीची रामेश्वर कोकाटे यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करून घेतली त्यावेळी मोजणी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार साडे सतरा गुंठे क्षेत्र हे धोक्रट यांच्याकडे निघाले असल्याचे सांगितले .त्यामुळे सोमठाणे येथील मेडिकल व्यावसायिक मधुकर सूर्यभान धोक्रट यांनी सदरची जमीन मोजणी बाबत कुठल्याही प्रकारे अपील न करता मोजणी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार रामेश्वर सोपान कोकाटे यांना साडे सतरा गुंठे जमीन क्षेत्र बांध टाकून काढून दिली आहे. धोक्रट कुटुंबीयांची सदर गटात वडिलोपार्जित शेती आहे व आजच्या परिस्थितीत सोमठाणे येथे 25 ते 30 लाख रुपये एकर जमिनीचा भाव आहे. परंतु समाजामध्ये एक वेगळा आदर्श निर्माण व्हावा दोन-पाच गुंठ्यासाठी एकमेकांचे सख्खे भाऊ जमिनीच्या वादावरून एकमेकावर कुऱ्हाडी उचलतात. दहा दहा वीस वीस वर्ष न्यायालयीन दावे सुरू असतात .त्यामुळे आपसापसात मतभेद वाढत जातात व त्याचे गंभीर परिणाम दोन्ही कुटुंबातील पिढ्यांना भोगावे लागतात. त्यामुळे जे आपले नाही त्याबद्दल कुठलेही अपेक्षा न ठेवता रीतसर ज्याची मालमत्ता निघाली त्याची देणे हे आपले कर्तव्य आहे .हे विचार मनात ठेवून सदरच्या गटात अतिरिक्त निघालेली साडे सतरा गुंठे जमीन रामेश्वर कोकाटे यांना कुठलाही वाद विवाद न करता मोजणी अधिकाऱ्यांच्या अहवालानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील न करता बांध टाकून रामेश्वर कोकाटे यांना परत दिल्याचा आदर्श धोक्रट कुटुंबीयांनी समाजापुढे उभा केला आहे.

*परमेश्वराने आपल्याला व आपल्या कुटुंबाला मेडिकल व्यवसाय व हॉस्पिटल च्या माध्यमातून पैशापेक्षाही खूप खूप काही नावलौकिक कमावून दिला आहे. त्यामुळे कुणाच्याही खोट्या मालमत्तेचा मालक होणे. आपल्या कुटुंबाला आवडणार नाही.म्हणूनच वडिलांनी साडे सतरा गुंठे जमीन रामेश्वर कोकाटे यांना परत करून समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे व त्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यामुळे समाजाने आपसात वाद न करता सामंजस्याने व तडजोडीने वागल्यास आपापसातील वाद कमी होण्यास मदत होणार आहे

डॉक्टर रोहित मधुकर धोक्रट
संचालक श्री.साई मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल,निफाड

## उरण तालुक्यांतील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यात एकूण 35 ग्रामपंचायती असून सदरच्या ग्रामपंचायतीच्या 2025 ते 2030 या कालावधीसाठी सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत दि. 23 एप्रिल 2025 रोजी जेएनपीए वसाहती मधील बहुउद्देशीय सभागृहात उपविभागीय अधिकारी पवन चांडक यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.या सोडती अंतर्गत अनुसूचित जाती,अनिसुचीत जमाती,व नागरिकांच्या मागास प्रवर्ग तसेच महिलांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या सरपंच पदासाठी ही सोडत काढण्यात आली होती.यावेळी तालुक्यांतील माजी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईरमनसेचे तालुका अध्यक्ष अॅड.सत्यवान भगत,विनोद




म्हात्रेव तालुक्यांतील 35 ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच सदस्य,नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. उरण तालुक्यांतील 35 ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी 2025-2030 या पाच वर्षात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सरपंच पदाची सोडत जाहीर केल्यानंतर दि. 23 एप्रिल 2025 रोजी जेएनपीए वसाहती मधील बहुउद्देशीय सभागृहात घेण्यात आली या सोडतीमध्ये 35 ग्रामपंचायती पैकी 17 ग्रामपंचायती मध्ये महिलांसाठी आरक्षण झाले आहे. आरक्षणामध्ये अनुसूचित जातीसाठी जासई ही एकमेव ग्रामपंचायत असून अनुसूचित जमाती साठी रानसई,चिरले,या दोन ग्रामपंचायतींचा समावेश आहे. अनुसूचित जमाती (महिला) साठी चाणजे या तालुक्यांतील सर्वात मोठया लोकसंख्या असणाऱ्या व 17 सदस्य असणाऱ्या एका ग्रामपंचायतीचा समावेश आहे.नागरिकांचा मागास प्रवर्ग(महिला) साठी हनुमान कोळीवाडा,पिरकोन,म्हातवली,मोठी जुई,केगाव या 5 ग्रामपंचायतींचा समावेश आहे.तर नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी वेश्वी,बोकडवीरा,सोनारी,कळंबुसरे या 4 ग्रामपंचायती आहेत सर्वसधारण(महिला) साठी,विंधणे,सारडे,पागोटे,बांधपाडा,फुंडे ,पाणजे,गोवठणे,पुनाडे,करळ,नागाव,डोंगरी आशा एकूण 11 ग्रामपंचायती आहेत. तर सर्वसाधारण साठी,कोप्रोली,भेंडखळ,जसखार,घारापुरी,वशिणी,आवरे ,नवीनशेवा,चिरनेर,दिघोडे,नवघर धुतूम,या प्रमाणे गाव निहाय 35 ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी आरक्षण जाहीर झाले असल्याची माहिती उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली

# समृद्ध भारत, सर्वश्रेष्ठ भारत

**(भारत-आतंकीस्तान संघर्षाच्या पार्श्वभूमीवर)**
**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार, मराठवाडा आवृत्ती**

भारत हा एक असा देश आहे ज्याने संकटांवर मात करत आपली स्वतंत्र आणि अभिमानास्पद ओळख निर्माण केली आहे. 1947 साली फाळणीच्या वेळी निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताला आतंकीस्तान (पाकिस्तान) सोबत अनेक वेळा संघर्ष करावा लागला. प्रत्येक युद्धात भारताने संयम, शौर्य आणि निर्णायक नेतृत्व दाखवून आपले सार्वभौमत्व अबाधित राखले. भारत-आतंकीस्तान संघर्ष : धोकेबाज शेजाऱ्याचा चेहरा आतंकीस्तान (पाकिस्तान) ने वेळोवेळी आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन करत भारताच्या शांततेला आव्हान दिले आहे. अतिरेकी हल्ले, घुसखोरी, सीमारेषेवर सतत गोळीबार अशा कारवायांनी आतंकीस्तान (पाकिस्तान) ने आपली धोकेबाज वृत्ती वारंवार सिद्ध केली आहे. विशेषतः उरी हल्ला आणि पुलवामा हल्ल्याने संपूर्ण देश संतप्त झाला होता. याला उत्तर म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्णायक नेतृत्वाखाली भारताने जल स्ट्राइक (Uri Surgical Strike) आणि डिजिटल स्ट्राइक (Article 370 हटविण्याचा ऐतिहासिक निर्णय) अशा अत्यंत प्रभावी उपाययोजना केल्या. यामुळे संपूर्ण देशात त्यांच्या नेतृत्वावर विश्वास अधिक दृढ झाला आहे.

**आज देशातील जनतेची भावना स्पष्ट आहे –**



धोकेबाज आतंकीस्तानला कठोर धडा शिकवला पाहिजे. भारत शांततेचा पुरस्कार करतो, मात्र आपल्यावर आलेल्या प्रत्येक हल्ल्याला आता पुरक आणि योग्य उत्तर देतो.

**जगभरातून भारताला वाढता पाठिंबा**

आजच्या घडीला, आतंकीस्तान (पाकिस्तान) ची अस्थिर आणि दुटप्पी धोरणं जगभर उघडकीस आली आहेत. भारताची संयमी, कणखर आणि स्पष्ट भूमिका पाहता अमेरिका, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, जपान यांसारख्या आघाडीच्या देशांनी भारताच्या भूमिकेला ठाम पाठिंबा दिला आहे. संयुक्त राष्ट्रसंघातही भारताचा आवाज आता अधिक प्रभावी आणि वजनदार झाला आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व : नवभारताचा उदय**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने केवळ सैनिकीदृष्ट्या नव्हे तर आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिकदृष्ट्याही मोठी झेप घेतली आहे. प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्मान भारत, जल जीवन मिशन, उज्ज्वला योजना यांसारख्या क्रांतिकारी योजनांमुळे देशातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा किरण पोहोचला आहे.

**कोरोना काळातील जागतिक मदत : वसुधैव कुटुंबकम् चे दर्शन**

कोरोना महामारीच्या कठीण काळात भारताने 'Vaccine Maitri' उपक्रमातून जगभरात कोविड लस पोहोचवली. गरीब आणि विकसनशील देशांना मोफत किंवा अत्यल्प दरात लस पुरवून भारताने आपली जागतिक जबाबदारी बजावली. औषधांचा पुरवठा करत अमेरिका, युरोपसह अनेक देशांना मदत केली. यामुळे भारताची प्रतिमा एका जबाबदार जागतिक नेत्याच्या रूपात अधिक बळकट झाली आहे.

**जागतिक स्तरावर भारताची नवी ओळख**

आज भारत संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर बनत आहे. जागतिक मंचांवर भारत निर्णायक भूमिका बजावत आहे. 'आत्मनिर्भर भारत', 'मेक इन इंडिया', आणि 'डिजिटल इंडिया' सारख्या मोहिमांमुळे भारत सर्व क्षेत्रांत वेगाने प्रगती करत आहे. आता जग भारताकडे एक उदयोन्मुख महासत्ता म्हणून पाहत आहे.

आतंकीस्तान (पाकिस्तान) च्या धोकेबाज कारवायांचा सामना करत भारताने संयम, शौर्य आणि प्रगल्भ धोरणाने स्वतःची ओळख टिकवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली घेतलेले जल स्ट्राइक, डिजिटल स्ट्राइक यांसारखे निर्णायक निर्णय भारताच्या सामर्थ्याचे प्रतीक आहेत. भारताने केवळ आपली सीमा सुरक्षित केली नाही तर जागतिक पातळीवरही आदराचे स्थान मिळवले आहे.

आजचा भारत आत्मविश्वासाने, आत्मनिर्भरतेने आणि सामर्थ्याने पुढे वाटचाल करत आहे –

**समृद्ध भारत, सर्वश्रेष्ठ भारत**

## समृध्दी समोसा घरपोच विक्री करून, रायमोहाचा

### जालिंदर सुरवसे हाकतोय संसाराचा गाडा...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

- पारंपारिक सुतार कामाचा व्यवसाय मोडकळीस आल्याने संसाराचा गाडा हाकलण्यासाठी नव्या वाटा शोधून थेट ग्राहकांना घरपोच चटकदार व चविष्ट अशा समृध्दी समोसा विक्रीचा फिरता व्यवसाय शोधून फाटलेल्या संसाराला सांधण्याचा प्रयत्न करतोय रायमोहाचा जालिंदर गंगाधर सुरवसे हा युवक, घरच्या घरी पत्नी आणि आई खमंग व स्वादिष्ट अशा समोसा आणि त्याच्या सोबत चिंचवण घेऊन बाप आणि मुलगा शिरूर सह परिसरातील अन्य गावात आणि वाड्या वस्त्यावर जाऊन विक्री करतात. ते देखील संध्याकाळी, आणि गल्लोगल्ली फिरून समोसा विक्री करण्याची त्याची विक्रीची कला देखील अफलातून म्हणावी लागेल. या अभिनव विक्रीतून आता जालिंदरने घरीच खमंग समोसा बनवून त्याची विक्री करू लागला आहे, आणि या समोस्याला नाव दिले आहे रायमोहाचा समृध्दी समोसा, शिरूर(कासार) शहरासह घाटशिळ पारगांव, खरवंडी, खोकरमोह, हिवरसिंगा, नवगण राजूरी, पाडळी, तागडगाव, खालापुरी, नागरे वाडी, या सह इतर अशा गावांत फिरत्या पध्दतीने समोसा विक्री करतांना वेळ निवडली संध्याकाळची याचे कारण ही तसेच सांगतो जालिंदर सुरवसे तो म्हणतो संध्याकाळी सर्वजन रानातून घरी येत असतात अशा वेळी विक्री साठी फार सायास करावे लागत नाही. दिवसभर काम करून लोक आपल्या घरी विसावतात अशा वेळी बाप, बेटा समोसा घेऊन रात्री ९:०० वाजेपर्यंत भटकंती करून समोसे विकून उशिरा रायमोहा येथे घरी पोहचतात. भांडवलाचा अभाव मोठा व्यवसाय कसा करणार याची खंत व्यक्त करतांना थांबला तर तो संपला या न्यायाप्रमाणे अल्प भांडवलावर हा व्यवसाय सुरू केला असुन सहा माणसांची भुक भागवण्याचे काम जालिंदर करतो, मालाबरोबर आपण विक्रीसाठी अगदी घरात आवाज जाईल याची काळजी घेत आवाजाची धार लावतो असे सांगुन आई, पत्नी आणि मुलगा सर्वाचेच हात झटत असल्याने सुखाचा घास मिळत असल्याचे समाधान जालिंदर सुरवसे यांनी व्यक्त केले आहे.



जालिंदर सुरवसे यांचा स्वादिष्ट समृध्दी समोसा...

## वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे आयोजित महा कॉलेब 2025 मध्ये ईपीआरचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: वर्ल्ड ट्रेंड सेंटर येथे महा कॉलेब 2025 आयोजित करण्यात आला. अविस्मरणीय असा हा सोहळा पार पडला. ज्यात अनेक राज्यातून आपल्या वेगळ्या शैलीमधून क्राफ्ट डिझाइन, कपडे, कला घेऊन दिग्गज आले होते. अपर्णा शहा संस्थापित अभियान ईपीआर टीम अपर्णा शहा यांना देखील विशेष अतिथी म्हणून निमंत्रण होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत राजदूतानी हजेरी लावली आणि हा जनजागृतीचा संदेश पोहचवला. ज्या प्रकारे आपण हा आनंद घेत आहोत, हा आनंद आपन चिरंतर टिकवू शकतो हे ईपीआरच्या माध्यमातुन लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी टीम यशस्वी ठरली. त्याचप्रमाणे सर्व शारीरिक आणि मानसिकरित्या अजून प्रगल्भ विचार आचार करणे अत्यंत गरजेचे आहे. खाणे, खेळणे, वाचणे (ईपीआर) हे जीवनात किती महत्वाचे आहे हे उपस्थित जनसमुदायास आणि प्राप्तस्थळी उपस्थित प्रेक्षक यामध्ये हा जनजागृतीचा आवाज पोहोचवण्यास ईपीआर टीमला यश आले.



## पहलगाम अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांची पायी गस्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, वार्ताहर**



नुकत्याच काश्मिर येथील पहलगाम येथे पर्यटकांवरील अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज सतर्कतेच्या भूमिकेतून पनवेल शहर पोलिसांनी शहरातील महत्वाच्या ठिकाणी पायी गस्त घालत अनेक बेकायदा व्यवसाय करणार्यांची झाडाझडती घेतली.
पहलगाम अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र हायअलर्ट सुरू आहे. पनवेलमध्ये सुद्धा कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे हे अधिक सतर्क असून त्यांनी आज सायंकाळी पनवेल शहरातील महत्वाच्या बाजारपेठा व गर्दीच्या ठिकाणी इतर अधिकारी व कर्मचार्यांच्या साथीने पायी गस्त घालत रस्त्यावर बेकायदेशीर व्यवसाय करणारे परप्रांतीय, वाहतूक कोंडी करणारे वाहन चालक आदींच्या संदर्भात त्यांनी लक्ष घालून काहींवर कारवाई करून आवश्यक त्या सूचना दिल्या. पनवेलकरांनी कोणतीही भिती न बाळगावी. पोलीस आपल्या सदैव रक्षणासाठी तत्पर असल्याचे तसेच कोणताही अनुचित प्रकार किंवा घटना घडल्यास त्यांनी त्वरित पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सुद्धा पायी गस्तीच्या माध्यमातून वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## देवरुख येथे जागतिक महिला आणि कामगार दिन संयुक्तिक होणार साजरा

### लोकनिर्माणचे डिजिटल माध्यमात होणार पदार्पण

**दैनिक युवक आधार**
**कोकण (शांताराम गुडेकर)**

१ मे हा महाराष्ट्र आणि कामगार दिन, यादिवशी लोकनिर्माण वृत्तपत्र गेली दहा वर्षे देवरुख येथे जागतिक महिला आणि कामगार दिन संयुक्तिकपणे साजरा करत आहे. यावेळी कर्तृत्ववान महिला आणि गुणवंत विशेष अधिकारी यांना लोकनिर्माण सन्मान हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येत असतो. यावर्षी लोकनिर्माण प्रतिष्ठान या राष्ट्रीय सामाजिक संस्थेच्या माध्यमातून लोकनिर्माण सन्मान २०२५ हा पुरस्कार महिला आणि कामगार क्षेत्रातील विशेष अधिकारी यांना देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. लोकनिर्माण प्रतिष्ठानची घोषणा १ मे २०२४ रोजी सामाजिक कार्यकर्ते आणि सहसंपादक युयुत्सु आर्ते यांनी केली होती.वर्षभरात या संस्थेच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले आहेत. आणि याच दिवशी हे पुरस्कार वितरण लोकनिर्माण प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून गुरुवार दिनांक १/५/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल पार्वती पॅलेस सभागृह, देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथे होणार आहे. याच कार्यक्रमात लोकनिर्माण वृत्तपत्राच्या माध्यमातून डिजिटल लोकनिर्माण मिडिया या नावाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त महिला आणि पुरुष यांनी उपस्थित राहावे असे आवाहन साप्ता. लोकनिर्माण संपादक बाळकृष्ण कासार,लोकनिर्माण प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष युयुत्सु आर्ते यांनी केले आहे.




# टंचाईग्रस्त देगलूर, मुखेड तालुक्याची तहान भागणार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** : लेंडी आंतरराज्य प्रधान प्रकल्प हा महाराष्ट्र व तेलंगणा राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पाची पाणी वापर क्षमता 5.23 टीएमसी इतका असून प्रकल्पामुळे 26 हजार 924 हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. काल 26 एप्रिल रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली व पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या उपस्थितीत लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीबाबत आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये नागरी सुविधांचा



आढावा घेण्यात आला. तसेच कामाच्या नियोजनाबाबत माहिती घेण्यात आली. प्रकल्पग्रस्तांसाठी वाढीव कुटूंब पुर्नवसन अनुदान वाटप करणे, शेतकऱ्यासाठी सानुग्रह अनुदान वाटप करणे व पहिल्या टप्प्यातील 7 गावातील भुखंड वाटप करणे इत्यादी गोष्टीचा परामर्श घेण्यात आला. या बैठकीस उपजिल्हाधिकारी पुर्नवसन मोरे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अधिक्षक अभियंता देगलूर दाभाडे, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, कार्यकारी अभियंता, लेंडी प्रकल्प देगलूरचे विवेकानंद तिडके, कार्यकारी अभियंता महावितरण पेंडारकर, तहसिलदार मुखेड जाधव, पोलीस निरीक्षक श्री. तिडके, श्री. टाक शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर, सरपंच भिंगोली गाढवे, उपसंरपंच सोनकांबळे आदीची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले बैठकीचा समारोप करताना देगलूर व मुखेड तालुक्यातील पाणी टाचाईची परिस्थीती विशद केली. येणाऱ्या काळात देगलूर व मुखेड तालुक्याला पाण्याची भीषण पाणी टंचाई जाणवण्याची शक्यता असल्यामुळे आता आगामी काळात याबाबत नियोजन करणे आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. देगलूर, मुखेड तालुक्याची तहान भागविण्यासाठी आंतरराज्यीय लेंडी प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे. लेंडी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व आवश्यक गोष्टी पूर्ण झालेल्या आहेत. घळभरणी केल्यास धरणात 145.15 दलघमी 5.23 टीएमसी उपयुक्त पाणी साठा निर्माण होईल. यामुळे देगलूर व मुखेड तालुक्याची तहान भागेल. तसेच समांतरपणे मुखेड तालुक्यातील बुडीत होणाऱ्या सर्व गावांचा प्रश्न त्वरीत मार्गी लावण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांसाठी सानुग्रह अनुदान वाटप, वाढीव कुटूंब पुर्नवर्सन अनुदान वाटप, भुखंड वाटप तसेच सर्व गावातील नागरी सुविधा लवकरात लवकर पुर्ण करुन प्रकल्पग्रस्तांना स्थानांतरीत करण्याचे व प्रकल्पाचे घळभरणीचे आदेश जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी दिले आहेत.

# शेकाप नेते जे.एम.म्हात्रे व प्रितम म्हात्रे यांचा महाविकास आघाडीला राम राम

### हिंदुस्थानात काहीही झालं तरी चालेल ,मी माझ्या निर्णयावर थांब, या पुढे महाविकास आघाडीत मी नाही..जे.एम.म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

रायगड जिल्ह्यात पनवेल ,उरण या दोन तालुक्यातील महाविकास आघाडीत बिघाडी झाली असल्याचे चित्र समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते पनवेल चे माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या बैठकीत आज महत्त्वपूर्ण अशा विषयांना हात घालत माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हा चिटणीस मंडळ यांच्या समक्ष महाविकास आघाडीच्या ध्येय धोरणाबाबत असमाधान व्यक्त करत आपली महत्त्वाची भूमिका मांडली. यामध्ये पनवेल व उरण तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे राजकीय निर्णय जिल्हा चिटणीस मंडळाकडून राज्य चिटणीस मंडळाकडे पक्ष श्रेष्ठी करतात ते निर्णय महाविकास आघाडी ने स्वतःच्या मर्जीने ठरवायचे नसतात पण यापुढे मी माझ्या मतांशी ठाम असून या पुढे हिंदुस्थानात काहीही झालं तरी चालेल जिल्हा चिटणीस मंडळाची निर्णय त्यांनी त्यांचे घ्यावे पण यापुढे मी महाविकास आघाडीत राहायला तयार नाही माझ्याकडून सर्वांना राम राम असे भावनिक उद्गार काढीत शेतकरी कामगार पक्षाच्या बैठकीत जे.एम. म्हात्रे यांनी भावना व्यक्त केल्या. पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की अनेक वर्ष जयंत भाई व अन्य पक्षश्रेष्ठींच्या सोबत जे.एम.म्हात्रे साहेबांनी निष्ठेने काम



केल्यानंतरही विधानसभेत आमच्या पक्ष श्रेष्ठींच्या सोबत महाविकास आघाडीने आमच्या नेत्यांच्या बाबतीत असमाधानी असे सहकार्य केले. शिवसेना, काँग्रेस यांनी शक्य ती भरीव मदत व सहकार्य केलं नाही.माझ्या बाबतीत टिपणी करणारे महेंद्र घरत यांनी आघाडी धर्मात काय केलं ते त्यांना माहिती आहे .शेतकरी कामगार पक्षाचा प्रामाणिक कार्यकर्ता आज उद्या ही भाऊंच्या सोबत सदैव खंबीर पणे उभा आहे.महाविकास आघाडीत भाऊंच्या सारख्या नेत्यांनी दोन दोन वेळा बैठकीमध्ये असमाधान व्यक्त केला पण त्यावर त्यांना समाधानी उत्तर न मिळणे आम्हालाही कुठे तरी सर्वांना पटत नाही आणि म्हणून आम्ही पक्षात आहोत पण महाविकास आघाडीत राहायला तयार नाही ,ही जी चर्चा नियोजन करून ठरवलेली नसून जे.एम.म्हात्रे यांनी अचानक पणे सध्याची कठीण परिस्थिती पाहता घेतलेला हा महत्वपूर्ण निर्णय ही आमच्यासाठी ही अवघड आहे . महाविकास आघाडीत अनेकांनी माझ्या बाबतीत मी अजितदादा गटात जात असल्याच्या वेगवेगळ्या वेळा चर्चा केल्या, अजितदादा पवार मला मुलासारखे मानतात तसेच शिंदे साहेबांच्या सोबत मी अनेक वेळा खूप काम केले आहे. भाजपमध्ये गडकरी साहेब व रवींद्र चव्हाण यांचे माझे जवळचे संबंध आहेत असे एक न अनेक चर्चांवर आमच्या बाबतीत वाचता केली गेली. पण माझे वडील पक्षाचे ज्येष्ठ नेते यांनी अजून पक्ष बदलण्याचा कुठलाही निर्णय घेतला नाही व आत्तापर्यंत माझ्याशी मुलगा म्हणून याबाबतीत कुठली चर्चा केली नसल्याने पक्ष सोडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही .या कठीण परिस्थितीत आम्ही सर्व पदाधिकारी कार्यकर्ते भाऊंच्या सोबत आहोत असे प्रसार माध्यमा समोर सांगितले. या सर्व प्रकारानंतर भविष्यातील शेतकरी कामगार पक्षाचे ध्येयधोरण काय असेल ,पदाधिकारी कोणा सोबत निवडणूक लढतील याबाबतीत मात्र या निर्णया नंतर पनवेल ,उरण तालुक्यातील निष्ठावंत लालबावटा समर्थक निवृत्तरी प्रश्नांच्या संभ्रमात असून सोशल मीडिया च्या माध्यमातून मत व्यक्त करताना दिसत आहे. लवकरच प्रितम म्हात्रे यांचा पक्ष सोडण्याचा विचार असल्याचे ही मत काहींनी विविध पध्दतीने मांडले.त्यात अनेक तर्क वितरक जोडून लावून सांगत शिवरायांच्या काळातील पुरंदरचा तह ,मिर्झाराजा व मावळे यांच्या त्या वेळच्या भूमिकेला जोडून इतिहासातील लेखाच्या माध्यमातून ही चर्चा करण्यात आली.

## ठाण्यात लाचखोर महिला तलाठी व अभियंता लाच घेताना अटकेत..

**दैनिक युवक आधार**
**ठाणे वार्ताहर**


ठाणे ता २९ एप्रिल : ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोन वेगवेगळ्या प्रकरणात तलाठी आणि पंचायत समितीच्या बांधकाम विभागाच्या अभियंत्याविरोधात लाच प्रकरनी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संशयित तलाठीने कळवा विभागात सात बारा संदर्भाच्या प्रलंबित कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी ४० हजार रुपयांची लाच मागितल्याचे समोर आले आहे. तर पंचायत समितीच्या अभियंत्याने ठेकेदाराकडून दोन लाख २० हजार रुपये मागितल्याचे समोर आले आहे. तलाठी विरोधात ठाणेनगर तर अभियंत्याविरोधात भिवंडी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तक्रारदार यांना गृहसंकुल उभे असलेल्या जागेवरील सात बारा गृहसंकुलाच्या नावे करायचा होता. परंतु हा सात बारा गृहसंकुलाच्या नावावर करण्यासाठी संशयित महिला तलाठी सिद्धी पातकर यांनी त्यांच्याकडून ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. यानंतर तक्रारदार यांनी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. पथकांनी पडताळणी केली असता, तलाठी पातकर यांनी ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यांच्याविरोधात सोमवारी ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.तर दुसरे प्रकरण भिवंडी येथील आहे. तक्रारदार हे ठेकेदार असून त्यांनी भिवंडी येथील बंदिस्त गटाराचा ठेका घेऊन काम पूर्ण केले होते. या कामांचे देयक बनिवण्यासाठी पंचायत समितीचा शाखा अभियंता प्रमोद जुमळे याने ठेकेदाराकडून दोन लाख ४० हजार रुपयांची मागणी केली होती. यानंतर ठेकेदाराने ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती.



# संजीवकुमार गायकवाड यांना कोल्हापूरी राज्यस्तरीय आदर्श पत्रकार प्रेरणा पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**नांदेड वार्ताहर**

जिल्यातील धर्माबाद तालुक्या मधील निर्भीड लेखणीचा सरताज बादशहा रोखठोक पत्रकार संजीवकुमार एस गायकवाड यांना "युवा क्रांती प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य प्रेरिते ता.करविर जिल्हा कोल्हापूर च्या वतीने २०२५ चा राज्यस्तरीय जनसेवा आदर्श पत्रकार प्रेरणा पुरस्कार जाहीर झाला असून हा पुरस्कार अनेक दिग्गज मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. आयोजक "युवा क्रांती प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य परिते ता.करविर जि.कोल्हापुर यांच्या संकल्पनेतून भव्य दिव्य पुरस्कार सोहळा दि.४ मे रोजी प्रसिद्ध समाजसेवक,समाजसेविका, अभिनेत्री, लेखक, गायक, गायिका शिक्षक हिरकणी अश्या मान्यवरांच्या पुरस्कारार्थीना दि.४ मे २०२५ रोजी परिते ता.करविर जिल्हा कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आला येणार आहे. युवा क्रांती प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्था हि अनेक गोरगरीब गरजूंना मदत सतत,करत असतात कोरोनाच्या महामारीत अन्न धान्य,किराणा सामान, कपडे,औषध उपचार करण्यात मदत केली,परिते परिसरातील अडीअडचणीत पाणी टंचाई, दुष्काळग्रस्ताना मदत अश्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम हि युवा क्रांती प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संस्था कामे केली व सतत करत असतात.या पुरस्कार कार्यक्रमास अनेक मंत्री महोदय दिग्गज कलाकार दिग्दर्शक उद्योजक राजकीय अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत राहणार आहेत. संजीवकुमार गायकवाड यांना पत्रकारीता क्षेत्रामधील उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना जाहीर झाला असून त्यांना यापूर्वीही मातोश्री रमाबाई आंबेडकर सामाजिक सेवाभावीसंस्था बेटमोगरा यांच्या वतीने, मायडी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था म. रा. यांच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य अहमदनगर यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात ही आले आसून कोरोना काळात ही ते घरी नं बसता रुग्णांची सेवा इजी.



हर्जिंदर संधूयांच्या सोबत गुरुद्वारा मार्फत दिल्या जाणाऱ्या लंगर सेवामध्ये हिरहिरीने सहभाग घेऊन जनसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून नांदेड बस्थानक रेल्वे स्टेशनं शहरातील रस्त्यावर राहणारी बेघर लोकांन परेंत अन्न पोहचता करण्याचे काम केले असल्यामुळे त्यांना कोरोना योद्धा म्हणून सुद्धा सन्मानित करण्यात आले आहे. राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कारांनी सन्मानित मा.श्री. संजीवकुमार सोपानराव गायकवाड पत्रकार तथा प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचा नांदेड जिल्हाध्यक्ष,दै.वीशिरोमणी विभागीय संपादक,दै.हिंदू सम्राट जिल्हा प्रतिनिधी,सामाजिक संघटना आंबेडकरवादी सेनेचा नांदेड जिल्हाध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते असून ते एस कुमार ग्रुप चे चेअरमन सुद्धा आहेत.

**त्यांना सामाजिक क्षेत्रात काम करण्याची आवड असल्यामुळे**

ते संस्थे मार्फत पोलीस भरती लेखी सराव परीक्षा,गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,मोफत डोळे तपासणी शिबिर,रक्तदान शिबीर,वृक्षारोपण,पेंटींग कारागीर शिबिर,समाजातील घटकांना शासकीय योजना लोकांपर्यंत पोहचवणे, महिलांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण,सुशिक्षित बेरोजगारांना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण,तज्ञ व्यक्ती व्याख्याने, निरनिराळ्या मोर्चा आंदोलन यामध्ये सहभागी,सर्वच महापुरुषांच्या जयंती साजरी केली जाते,गावातील सर्व सण उत्सव यात्रा यांमध्ये पाणी वाटप,खिचडी वाटप,सहभागी असे कितीतरी समाज उपयोगी विधायक उपक्रम व समाजासाठी योगदान दिले आहे.

या पुरस्कारांनी त्यांना नवीन कामं करण्याची उर्जा दिली आहे भविष्यात यापेक्षाही मोठ्या प्रमाणावर सामाजिक कार्य केले जाईल फक्त आपणा सर्वांचा शुभ आशिर्वाद व प्रेम असंच कायम राहूदे. राज्यस्तरीय पत्रकारीता सामाजिक,विविध क्षेत्रातील आतापर्यंत ५८ पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत.महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदर्श व्यक्तीला विविध पुरस्काराने,

**विविध व्यक्तींना राज्यस्तरीय हा पुरस्कार दिला जातो.**

यामध्ये राज्यस्तरीय पत्रकारिता,शैक्षणिक, सामाजिक,राजकीय,पत्रकार यांना हा 'मान नेतृत्वाचा सन्मान कर्तृत्वाचा' हा राज्यस्तरीय जनसेवा आदर्श पत्रकार प्रेरणा पुरस्कार २०२५ चा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्हातील शिक्षक वृंद,राजकीय पक्ष पत्रकार बांधव माझ्या कुटुंबासह मित्र परिवार सर्व स्थरातून त्यांच्या कौतुकाचा वर्षांव होत आहे.

# वेळापूर तालुका निफाड येथे फिरते लोक अदालत आणि विधी साक्षरता शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**लासलगाव** :- दि 28/4/2025 रोजी ग्रामपंचायत वेळापूर ता. निफाड येथे जिल्हा सेवा विधी सेवा प्राधिकरण नाशिक, निफाड तालुका विधी सेवा समिती, निफाड वकील संघ, आणी ग्रामपंचायत वेळापूर यांच्या संयुक्त विद्यमाने फिरते लोक अदालत आणी विधी साक्षरता शिबीर आयोजीत करण्यात आलेले होते. या शिबिराची सुरवात व पोखरा योजनेबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने गावात सायंकाळी मशाल रॅली काढण्यात येऊन कार्यक्रमला सुरवात करण्यात आली. मान्यवरचा सन्मान करण्यात आला. धनादेश बाबत्त न्यायलयात असलेले केस बाबत मार्गदर्शन ॲड. शिंदे यांनी केले. महिलांवरील अत्याचार, खोट्या केसेस व विधी सेवेचे असलेले महिलांना अधिकार, सामान अधिकार, हक्क, महिलांवर होणारे आमनुष छळ, मानसिक व शारीरिक छळ यावर विषयावर सखोल मार्गदर्शन व जनजागृती श्रीम. एस. पी. देशपांडे मॅडम दिवाणी न्यायधीश वरिष्ठ स्तर निफाड यांनी



या माध्यमातून केले. *तसेच शासनाच्या नानाजी देशमुख (पोखरा योजना ) बाबत कृषी विभागाचे अधिकारी श्री. राहुल धनगर, मंडळ कृषी अधिकारी, लासलगाव यांनी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घ्यावा या बाबत मार्गदर्शन केले.* *त्याच बरोबर प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल मंजूर आहेत. सदर घरकुल लाभार्थी यांनी 65 दिवसात घरकुल पूर्ण केलेले लाभार्थी. अरुण पालवे विजय पालवे, सोपान विशे, शांताराम कुटे, संतोष शिंदे, संतोष घुगे यांचा सत्कार अध्यक्ष यांच्या हस्ते व विस्तार अधिकारी श्री. राजेश थोरात यांच्या हस्ते करण्यात आला.
कार्यक्रममाचे अध्यक्षीय भाषनात गुजराथी साहेब यांनी सांगितले की, भारतामध्ये सव्वा चार कोटी खटले प्रलंबित असून सदरचे खटले निकाली काढण्यासाठी आपण फिरते लोक न्यायालयाच्या माध्यमातून ही जनजागृती करत खटले निकाली काढत असतो. काही किरकोळ उदाहरणांचा संबंध दाखवताना अशा खटल्यामुळे दोन्हीही पार्टीना मानसिक आर्थिक त्रासाला बळी पडावे लागते आपण सर्व समाजाला असताना असे खटले प्रलंबित ठेवू नये ते तात्काळ लोक न्यायालयांमध्ये निकाली काढावी जेणेकरून ह्या त्रासातून मुक्त होता येईल. असे मोलाचा सल्ला मा. श्री. ए. व्ही. गुजराथी साहेब यांनी यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलतांना सांगितले. या कार्यक्रमाची स्तुती त्यांनी केली. *. सव्यसाची गुरुकुलम व प्रतापशिव संस्थेचे वतीने मर्दानी खेळाचे भव्य प्रात्यक्षिक या वेंळी दाखवण्यात आले.* *या कार्यक्रमात न्याय व विधी सेवा जिल्हा न्यायधीश, दिवाणी न्यायधीश,वकील संघांचे अध्यक्ष, सचिव, लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक,वेळापूर चे माजी सरपंच, तंटा मुक्त समितीचे म. अध्यक्ष,विकास संस्था चेरमन,पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी,कृषी विभागचे मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, जिल्हा परिषद शाळेचे मुख्यध्यापक, शिक्षकावृंद, ग्रामपंचायत चे कर्मचारी, बचत गट प्रतिनिधी, अंगणवाडी कर्मचारी,ग्रामपंचायत अधिकारी श्री. रविंद्र धुंडाळे साहेब यांनी उत्तम नियोजन केले. लासलगाव पोलीस स्टेशन चे सपोनि भास्कर शिंदे हे उपस्थित होते. *कार्यक्रम समारोप ॲड. केशव शिंदे व विशाल पालवे यांनी केला.*
*नंतर ग्रामपंचायत वेळापूर यांच्या वतीने पाहुण्यांना स्नेह भोजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आलेला होता.**

# शिक्षा या लघुपटाला सर्वांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

**दैनिक युवक आधार**

**मुंबई** - लय भारी production YouTube channal प्रस्तुत शिक्षा लघु फिल्म लेखिका सौ.बबिता गावस यांनी उत्तम प्रकारची वेगळी कथा लिहून सामाजिक संदेश दिला आहे.. दिग्दर्शक प्रमोद न सूर्यवंशी यांनी उत्तम पूर्ण प्रयत्न केला आहे या कथेला न्याय देण्यासाठी लोकांना ही आवडत आहे.
रमेश मारुती पाटील आणि प्रमोद सूर्यवंशी यांनी उत्तम संवाद लिहून सामाजिक संदेश दिला..
यातील कलाकार सुद्धा लय भारी अभिनयाने लोकांना आकर्षित करत आहे.. गौरव पुंडे, आणि प्रमोद सूर्यवंशी यांनी उत्तम संकलन केले.. संतोष रामचंद्र जाधव, रेखा चंद्रकांत हरियाण, सोनिया गोळे, योगेश हरणे, अंजली महाजन, श्रीराम घडे, शरद घुडे, उत्तम कुलकर्णी या सर्व नवीन कलाकारांनी उत्तम अभिनय करून एक छाप सोडली आहे. लोकांना शिक्षा लघुपट आवडत आहे. . हा लघुपट इंटरनेशन, नॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये सध्या 16 पुरस्कार मिळालेले आहेत..गोवा फिल्म फेस्टिवल मध्ये आणि मुंबई फिल्म फेस्टिवल मध्ये ही नोंदणी केली आहे लवकरच.. ते ही पुरस्कार प्रदान होईल.... तुम्ही सर्व प्रेषक वर्ग यांनी आम्हाला लघुपट पाहून आम्हा सर्वांना नवीन ऊर्जा येते अजून काही नवीन करण्यासाठी तुमचे प्रेम असच सर्व नवीन कलाकारांवर असूद्या..



# अखेर चिखली ते व्याड या रस्त्या च्या कामामध्ये आले यश!

### सार्वजनिक बांधकाम विभागाने घेतली कामा बद्दल दखल..शेख तोसिफ यांच्या निवेदनला यश....

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी /रिसोड.**
**रणजीत सिंह ठाकुर**



.तालुक्यातील रिसोड ते वाशिम रोडवर चिखली वरून व्याड मार्गे गोरेगाव हिंगोली जोडणारा अतिशय महत्त्वाचा रस्ता आहे, या रस्त्यावर चिखली ते व्याड या पाच किलोमीटर रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झालेली होती, सदर डांबरीकरण रस्ता हा गेल्या पाच वर्षांपूर्वी पासून पूर्णपणे उकडुन गेला असून या रस्त्याने मोठ मोठे खड्डे सुद्धा पडलेले होते ,सदर नादुरुस्त रस्त्यामुळे या ठिकाणी अनेक अपघातही झालेले आहेत ,या रस्त्याने चिखली ,रिसोड व वाशिम जाणाऱ्यांची तसेच हिंगोली गोरेगाव जाण्यासाठी सुद्धा हा अतिशय महत्त्वाचा रस्ता समजला जातो या रस्त्याने सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत शेकडे वाहने चालतात, मोटरसायकल पासून ते फोर व्हीलर व एसटी बसच्या अनेक फेऱ्या या रस्त्याने असून शाळेच्या स्कूलबस शाळकरी मुले मुली या रस्त्याने बरेच अशी वर्दळ असते, चिखली ते व्याडच्या मध्यभागी एक शाळा कॉलेज सुद्धा अस्तित्वात असून सदर रस्त्यावर चालताना नागरिकांना अतिशय कसरत करावी लागत होती ,सदर बाबीची दखल घेत वंचित बहुजन युवा आघाडीचे शेख तोसीफ शेख हसन यांनी दखल घेतली असून त्या कामा बद्दल त्यांना निवेदन द्वारे यश प्राप्त झाले आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याच्या वर दखल घेऊन सदर रस्ता हा नवीन सुरू करण्यात आलेला आहे, रस्त्यासाठी आंदोलन केले होते नेहमीचा हा त्रासाचा रस्ता सगळ्यां गावकरी मंडळी ने या सगळ्या बाबीला समजून सोबत राहून काम केले आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामा ला यश प्राप्त झाले हा काम लवकर होऊन लोकांचा सुटका दूर होईल...

# "सेक्टर 9 प्रीमियर लीग सिझन 3" चे शानदार आयोजन – नवी मुंबईत उत्साहाने रंगले टेनिस बॉक्स क्रिकेटचे पर्व

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई, वार्ताहर**

नवी मुंबईत क्रिकेटप्रेमींसाठी एक उत्सव ठरलेला सेक्टर ९ प्रीमियर लीग यंदा आपल्या तिसऱ्या सिझनसह मोठ्या थाटात आणि जोशात साजरा करण्यात आला. विनय खडसे यांच्या संकल्पनेतून आणि मेहनतीतून २६ आणि २७ एप्रिल २०२५ या दोन दिवसांत ही भव्य टेनिस बॉक्स क्रिकेट स्पर्धा पार पडली. या लीगने केवळ खेळाचा उत्कर्ष दाखवला नाही, तर नवी मुंबईतील तरुणांना एक नवे व्यासपीठही उपलब्ध करून दिले. स्पर्धेमध्ये एकूण १० संघांनी भाग घेतला होता. प्रत्येक संघाने आपला सर्वोत्तम खेळ सादर करत सामना जिंकण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. सुरुवातीपासूनच स्पर्धेमध्ये चुरस पाहायला मिळाली आणि खेळाडूंचा उत्साह पाहून प्रेक्षक देखील मंत्रमुग्ध झाले. सेक्टर बॉईज




संघाने अखेरच्या फेरीत दमदार खेळ करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. मितीन वालेकर आणि किरण वानखेडे यांच्या मालकीचा हा संघ होता. या संघासाठी स्वामी कोनर आणि अमन जयस्वाल या आयकॉन खेळाडूंनी महत्वपूर्ण कामगिरी केली आणि संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या क्रमांकावर वर्चस्वा संघाने आपले स्थान निश्चित केले. या संघाच्या मालकीण सुरेखा कांबळे असून अक्षय कांबळे आणि मनोज डोर्के यांनी संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला. तिसरे स्थान ओन्ली ९ संघाने पटकावले, ज्याचे मालक निखिल तळेकर होते आणि हितेश शेट्टी व दर्शन जैन यांनी संघासाठी बहुमूल्य कामगिरी बजावली. या स्पर्धेच्या आयोजनामध्ये मैदानावरील व्यवस्थापन, सामना नियोजन, खेळाडूंची शिस्त आणि प्रेक्षकांसाठी केलेली सोय यामुळे वातावरण अतिशय सुंदर आणि आनंददायी झाले होते. सर्व सामन्यांमध्ये उच्च दर्जाचा खेळ पाहायला मिळाला आणि तरुण खेळाडूंमध्ये स्पर्धेची लहर अनुभवायला मिळाली. या यशस्वी आयोजनानंतर आयोजक विनय खडसे यांनी सर्व संघ मालक, खेळाडू, प्रेक्षक, आणि स्वयंसेवकांचे मनःपूर्वक आभार मानले. विशेषतः त्यांनी सिद्धेश टेम्बकर, अक्षय कांबळे, अनीस दात्रे आणि रोहन पांडरे यांचे विशेष उल्लेख करून त्यांच्या अमूल्य सहकार्याबद्दल आभार मानले. यांच्यामुळे स्पर्धेची आखणी, आयोजन आणि व्यवस्थापन अधिकच भक्कम झाले व स्पर्धा सुरळीत पार पडली.

विनय खडसे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "या स्पर्धेत सर्वांनी प्रामाणिकपणे आणि जोशात सहभाग घेतला. सर्व खेळाडूंच्या मेहनतीला सलाम! आम्ही भविष्यातही असेच कार्यक्रम घेऊन येऊ जेणेकरून नवी मुंबईतील तरुणांना आपली कौशल्ये दाखवण्याची संधी मिळत राहील." सेक्टर ९ प्रीमियर लीग सिझन ३ ने नवी मुंबईतील स्थानिक क्रिकेटमध्ये नवी ऊर्जा निर्माण केली असून पुढील सिझनसाठी आधीच उत्साहाचं वातावरण तयार झालं आहे.

## अनिल पालोदे यांना छत्रपती शिवाजी महाराज बेस्ट राजकीय धुरंधर पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**




**सिल्लोड :-** तालुक्यातील चांदापूर गावातील प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख अनिल पालोदे यांना प्रहार जनशक्ती पक्ष संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या हस्ते प्रथम क्रमांक राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज राजकीय धुरंदर बेस्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आला. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर तालुक्यात दुष्काळी परिस्थिती असताना आसूड मोर्चा ,पंचायत समिती जन आक्रोश मोर्चा ,विभागीय कार्यालयावर उपोषणे व अपंग विधवा विद्यार्थी यांच्यासाठी विविध आंदोलने व आरोग्य तपासण्या आदी उपक्रमामुळे प्रशासनास व सरकारला धारेवर धरणारे अनिल पालोदे यांच्या कामाची दखल घेऊन याना संत एकनाथ रंगमंदिर संभाजीनगर येथे प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देण्यात आले यावेळी प्रहार शेतकरी संघटना विदर्भ प्रमुख घनश्याम पेठे, अभियान प्रमुख महेश बडे, जिल्हाप्रमुख सुधाकर शिंदे ,दिव्यांग जिल्हाप्रमुख शिवाजी गाडे ,शहर प्रमुख कुणाल राऊत, कृष्णा गाडेकर, भाऊसाहेब शेळके, सुभाष वाडेकर, राम गाडे, शांताराम बनकर, योगेश चव्हाण आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकसेवा हक्क दिनानिमित्त एमएनआर शाळांमध्ये विविध स्पर्धा; ८०० हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**




लोकशाही हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीस २८ एप्रिल रोजी पूर्ण झालेले दशक हे जनतेच्या हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्यावतीने 'लोकसेवा हक्क दिना'निमित्त विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः कामोठे येथील एमएनआर शाळांमध्ये भरवण्यात आलेल्या पोस्टर, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लोकसेवा हक्क दिन हा फक्त एक औपचारिकता न राहता विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणारा आणि लोकशाही प्रक्रियांचे महत्त्व समजावणारा ठरेल, यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या वेळी सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांनी विद्यार्थ्यांना सेवा हक्क कायद्याचे मूलभूत तत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, प्रत्येक नागरिकाला विशिष्ट कालावधीत शासकीय सेवा मिळण्याचा कायदेशीर अधिकार आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे सामान्य जनतेला अनेक सेवा अधिक पारदर्शक व वेळेवर मिळू लागल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये याची जाणीव निर्माण करणे हा या स्पर्धांचा मुख्य उद्देश होता. स्पर्धांमध्ये एकूण सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पोस्टर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रंगीत कागदांवर विविध सामाजिक संदेश पोहोचवणारी चित्रं रंगवली. निबंध स्पर्धेत 'लोकशाही आणि माझी जबाबदारी', 'सेवा हक्क कायदा: एक जनतेचा विजय' अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. वक्तृत्व स्पर्धेत तर काही विद्यार्थ्यांनी इतक्या प्रभावी भाषणांची उदाहरणं दिली की उपस्थित शिक्षक आणि पालकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचं कौतुक केलं . या कार्यक्रमाची सांगता विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षीसं देऊन करण्यात आली. ही पारितोषिके सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांच्या हस्ते देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता.

## माणगांव उतेखोलवाडीत अज्ञात इसमाने २ वाहने जाळली...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव रायगड**



**माणगांव :-** माणगांव शहरात मागील काही दिवसांपासून धक्कादायक प्रकार समोर येत आहेत.यामध्ये अजून एक भर पडली आहे.माणगांव शहरातील उतेखोलवाडी येथिल सर्वसामान्य वाघमारे कुटुंब.हातावर कमविणे व पानावर मेहनत करून खाणे अश्या परिस्थितीत बाळा वाघमारे यांचे मुलगे विलास वाघमारे, विनायक वाघमारे हे रिक्षा, प्रवासी वाहतूक गाडी असे व्यवसाय करतात. हे वाघमारे कुटुंब राहत असलेल्या उतेखोल वाडी येथील त्यांचा राहत्या घरासमोर उभी असलेली रिक्षा व मॅक्सिमो गाडी ह्या दोन गाड्या २८ एप्रिल च्या रात्री अज्ञात इसमाने पेटवून दिल्या यामध्ये ह्या दोन्ही गाड्यांची अगदी राख झाली आहे. ह्या घटनेत वाघमारे यांच्या मालकीचे रिक्षा क्रमांक एम एच ०६ झेड ४२५७ व मॅक्सिमो क्रमांक एम एच ०६ बी ई ५४६ ह्या दोन्ही गाड्या जळून खाक झाल्या आहेत.रात्री अपरात्री माणगांव मधील महाराणा प्रताप नगर मधील रोहिदास पवार यांच्या स्विफ्ट डिझायर कार खाली देखील एका मनोविकृत व्यक्तीकडून आग लावण्याचा प्रयत्न झाला होता.मात्र प्रसंगावधान राखल्याने हा अपघात टळला होता. मात्र वाघमारे यांच्या गाड्या जाळणे ही घटना खूप क्लेशदायक आणि दुःखदायक आहे असे मत माणगांव शहरातील नागरिक व्यक्त करत आहेत.माणगांव शहरात घडणाऱ्या अश्या घटनांना आळा घालण्यासाठी माणगांव पोलिसांनी शहरातील प्रत्येक नगरात रात्रीच्या गस्ती वाढवाव्यात अशी मागणी माणगांवकर नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. उतेखोल वाडी वाघमारे यांच्या गाडी जाळल्याप्रकरणी माणगांव पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून,पुढील तपास माणगांव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणगांव पोलीस करत आहेत.

## रत्नागिरी जिल्ह्यातील १५ पोलीस आधिकार्यासह कर्मचार्यांना महासंचालकाचे सन्मान चिन्ह जाहीर

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**
**चिपळूण प्रतिनिधी**



रत्नागिरी जिल्ह्या पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या १५ पोलीस अधिकारी अमलंदाराना पोलीस महासंचालकाचे सन्मान चिन्ह सोमवारी जाहीर करण्यात आले आहेत. पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्या बदल त्याचा महासंचालकाचे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे . प्रवर्ग १० मध्ये विशेष सेवा करणारे रत्नागिरी मुख्यालयातील पोलीस हवालदार नितीन डोळस याचा समावेश आहे तर प्रवर्ग ८ मध्ये १५ वर्षे सेवा केल्या प्रकरणी रत्नागिरी स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख नितीन ढेरे महामार्ग पोलीस मदत केंद्र कशेडी चे सहाय्यक पोलीस फौजदार सुधाकर रहाटे महामार्ग पोलीस मदत केंद्राचे सहाय्यक फौजदार संजय मुरकर देवरुख पोलीस ठाण्यात चे साहाय्यक फौजदार दिपक पवार रत्नागिरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस फौजदार राजेंद्र सावंत रत्नागिरी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलिस हवालदार दिनेश आखाडे महामार्ग पोलीस केंद्र कशेडी चे पोलीस हवालदार विजय मोरे पुर्णगड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार प्रकाश मोरे महिला पोलीस हवालदार सोनाली शिंदे अलोरे पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार दिपक ओतारी जयगड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार मिलिंद कदम चिपळूण पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार प्रितेश शिंदे दापोली पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संतोष सडकर पुर्णगड पोलीस ठाण्याचे पोलीस फौजदार महेश सावंत याचा समावेश आहे.

# "सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी यवतमाळकरांचा पुढाकार; जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन सादर"

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



यवतमाळ दि(२८) :-देशात अलीकडे घडलेल्या पहेलगाम हल्ल्यानंतर सोशल मीडियावर द्वेषभावना पसरवण्याचे प्रयत्न होत असल्याच्या पार्श्वभूमीवर,यवतमाळ शहरातील विविध सामाजिक संघटनांनी आज दिनांक 28 एप्रिल (सोमवार) रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता यांना निवेदन दिले. सदर निवेदनाद्वारे,सोशल मीडियावरून प्रसारित होणाऱ्या भडकाऊ व समाजात तेढ निर्माण करणाऱ्या संदेशांविरोधात त्वरीत कार्यवाही करावी,अशी मागणी करण्यात आली. या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की,पहेलगाम हल्ल्याचा निषेध करत असताना संपूर्ण मुस्लिम समाजाला जबाबदार ठरवण्याचा प्रकार अत्यंत निषेधार्ह आहे.यामुळे समाजात तणाव व फूट निर्माण होण्याचा धोका आहे. यवतमाळसारख्या सामाजिक सलोख्याची समृद्ध परंपरा असलेल्या शहरात शांतता आणि एकोपा टिकवण्यासाठी प्रशासनाने सजग राहावे व आवश्यक ती कारवाई करावी,अशी भूमिका नागरिकांनी मांडली.

निवेदन देताना उपस्थित असलेल्या प्रमुख संघटना व प्रतिनिधी:
- महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना, यवतमाळ
- युवा जागर ट्रस्ट,यवतमाळ
- नारी रक्षा समिती,यवतमाळ
- धैर्य सोशल वेल्फेअर फाउंडेशन
- मराठा सेवा संघ
- कॉम्रेड सचिन मनवर मित्र परिवार

**उपस्थित प्रतिनिधी:**
ज्ञानेश्वर गायकवाड,दीपक पिसाळकर, प्रतिक तराळकर,ॲड.धनंजय लोखंडे,ॲड. जयसिंग चव्हाण,प्रा. घनश्याम दरणे,ॲड. सीमा तेलंगे,विनोद दोंदल,अतिक शेख,किशोर बाभुळकर,शशिकांत खडसे,कॉम्रेड सचिन मनवर,राहुल दाभाडकर,रमीज शेख,कमलेश बघेल, स्नेहल रेचे,तेजस चव्हाण,प्रा.पंढरी पाठे आदी.

निवेदनाद्वारे प्रशासनाला विनंती करण्यात आली की,सामाजिक माध्यमांवरून प्रसारित होणाऱ्या प्रक्षोभक संदेशांची गंभीर दखल घेऊन संबंधितांवर कठोर कार्यवाही करावी.तसेच,नागरिकांना शांतता व सामाजिक सलोखा राखण्याचे आवाहन करावे.

कोट ----
"समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांना कायद्याचा कठोर इशारा देणे गरजेचे आहे. सोशल मीडियाचा गैरवापर करून द्वेष पसरवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई झाली पाहिजे, जेणेकरून यवतमाळचा सामाजिक सलोखा टिकून राहील."
**– ॲड.सीमा तेलंगे (सोशल ॲक्टिव्हिस्ट)**
"यवतमाळ जिल्ह्यातील शांतता आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध आहे.सामाजिक माध्यमांवरून द्वेष पसरवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या संदेशांवर लक्ष ठेवले जात आहे आणि अशा प्रकारांवर कठोर कार्यवाही केली जाईल."
**– कुमार चिंता,(जिल्हा पोलीस अधीक्षक,यवतमाळ)**

# पैठण तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या हरित भविष्याच्या दिशेने एक महत्तवाचा टप्पा,आमदार विलास भुमरे यांचे प्रतिपादन,

### तोंडोळी:"ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना भाग ,एक, टप्पा दोन" चे खासदार संदिपान भुमरेंच्या व आमदार विलास भुमरे हस्ते लोकार्पण.

**दैनिक युवक आधार**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**

पैठण तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांसाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. आपल्या तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प "ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना भाग एक, टप्पा दोन" याचे भव्य लोकार्पण सोहळा पैठण तालुक्यातील मौजे तोंडोळी येथे दि.२६ एप्रिल शनिवार रोजी सायंकाळी खासदार संदीपान भुमरे व आमदार विलास भुमरे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. विलास भुमरे यांची पैठण आमदार पदावर निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या नागरी सत्कार समारंभात सन्मानित करण्यात आले.हा सत्कार माझ्यासाठी एक मोठी प्रेरणा असून, ही जबाबदारी अधिक जोमाने पार पाडण्याची ऊर्जा यामुळे मला मिळाली आहे. या योजनेसाठी तत्कालीन मुख्यमंत्री व आताचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाढीव निधी उपलब्ध करून देत मार्गी लावली. या "ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना"अंतर्गत मौजे तोंडोळी, गाढेगावपैठण आणि लोहगाव या परिसरातील एकूण १००० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार आहे.या योजनेच्या माध्यमातून शेतीला भरपूर पाणीपुरवठा होणार असून, याचा थेट फायदा शेतकरी बांधवांना होईल. शेतीची उत्पादकता वाढेल,अनेक पीक प्रकार घेता येतील,उत्पन्नात मोठी वाढ होईल आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यास निश्चितच मदत होणार असल्याचे प्रतिपादन युवा आमदार विलास भुमरे यांनी केले. तसेच, संपूर्ण योजनेचे काम वेगाने प्रगतीपथावर आहे.उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, यासाठी मी सातत्याने संबंधित विभागांशी संवाद साधत आहे. व आवश्यक त्या बैठका घेऊन पाठपुरावा करत आहे.आपल्या शेतकऱ्यांचे स्वप्न असलेली



मोलाची भूमिका बजावेल. या योजनेची यशस्वी अंमलबजावणी होण्यासाठी जे सर्व अधिकारी,अभियंते, कर्मचारी वर्ग,स्थानिक नेतृत्व,आणि विशेषतः आपल्या कष्टकरी शेतकरी बांधवांनी जे परिश्रम घेतले आहेत, त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.हा सर्वांचा सामूहिक विजय आहे. आगामी काळात, आपल्या पैठण तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शेतकरी बांधवांच्या सर्व समस्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी मी सदैव तत्पर राहणार असल्याची ग्वाही आमदार विलास भुमरे यांनी दिली.

मला अतिशय आनंद वाटतो की,ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेचे उद्घाटन माझ्याच कार्यकाळात म्हणजे ३/६/२०१२ रोजी झाले होते.यात काम करत असताना खुप काही अडचनी होत्या पण मी प्रयत्न करतच राहीलो,अखेर या योजनेचा सुभारंभ माझ्याच काळात म्हणजे २६/४/२०२८ रोजी झाला याचा मला आनंद आणि सार्थ आभिमान वाटतो.
**सरपंच संजय गरड**
**ग्रामपंचायत तोंडोळी ता पैठण.**

या योजनेत ७४जळगाव,शहापुर मानेगाव,खामजळगाव या गावांचा समावेश करावा अशी मागणी कृषी उत्फन्न बाजार समितीचे सभापती राम एरडे,७४जळगावचे सरपंच प्रतिनिधी अमोर एरंडे, माजी उपसरपंच नितीन एरंडे बाबासाळेब मुळे,सदिप लाटे, राम मतकर यांच्यासह शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली.त्यावर आ.भुमरे म्हणाले की,याबाबत मी शासन दरबारी प्रयत्न करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

ही योजना संपूर्ण करण्यासाठी माझा अखंड प्रयत्न आणि धडपड सुरूच राहील.
ही योजना केवळ सिंचनाची सुविधा देणारी नसून,आपल्या तालुक्याच्या समृद्धीचा नवीन अध्याय सुरू करणारी आहे.शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट व्हावे,शेतीवर आधारित उद्योगांना चालना मिळावी, आणि ग्रामीण भागात स्थैर्य यावे, यासाठी ही योजना

यावेळी छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे मंडळाचे अधिक्षक अभियंता भारत शिंगाडे,कार्यकारी अभियंता उमेश वानखेडे,उप अभियंता विठ्ठल गावंडे,कृषी उत्पन्न बाजार समीतीचे उपसभापती राम एरंडे,नंदुकुमार काळे,रविंद्र शिसोदे,माजी नगराध्यक्ष राजु गायकवाड,रमेश पवार,विनोद बोंबले,कासाहेब टेके,डॉ. गणेश शिंदे,किशोर एरंडे,आशोक धर्मे,गणेश ईथापे,दिलीप जगताप,सतिष शेळके,अंकुश बोरुडे,यांच्यासह तोंडोळी गावचे सरपंच संजय गरड,उपसरपंच रामचंद्र तांबे,ग्रामसेवक सचिन दिघुळे,काशिनाथ गरड,विष्णु शेळके,मधुकर नरवडे,चंद्रकांत आगळे,गोरख तांबे,दत्तु शेळके,संजय गुंजाळ,अरुण गरड,शेख शाकीर,राम गरड,अरुण तांबे,किशोर शेळके,अजय शेळके,नानासाहेब गरड, परिसरातील शेतकरी बांधव व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश




**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-.**
**जितेंद्र खोडे**

राळेगाव दि(२८) : तालुक्यातील गोपालनगर येथील अंगणवाडी सेविका सरला आडे तसेच ग्रामपंचायतच सचिव शंकर मुजमुले, पर्यवेक्षिका स्नेहा अनपट यांनी बालविवाह होत असल्याबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी सागर विठाळकर यांना माहिती दिली. त्यांनी ही माहिती तहसीलदार अमित भोईटे, गटविकास अधिकारी केशव पवार यांना दिली. त्यानंतर वेगाने सूत्र हलविण्यात येऊन बालविवाह रोखण्यात यश आले. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (यवतमाळ) विशाल जाधव यांनासुद्धा माहिती देण्यात आली. त्यांनी ताबडतोब सरंक्षण अधिकारी (संस्थात्मक) अविनाश पिसुरडे यांना टिमसोबत गोपालनगर (पारधी बेडा) येथे पाठविले. सपूर्ण टिम गावात दाखल झाली. सर्वांना या बाबत मार्गदर्शन करुन नोटीस बजावण्यात आली. यावेळी तलाठी रुपेश चचाने, सरपंच किसना झाडे, उपसरपंच प्रतिभा फुलमाळी, चाईल्ड लाईन सुपरवायझर गणेश आत्राम, पोलिस विभागाचे गोपाल जाचकर, आशा विभा मंगाम, कोतवाल मंजुषा सलाम यांची उपस्थिती होती. या बाबत तहसीलदार अमित भोईटे यांनी माहिती मिळताच त्यांनी तलाठी तसेच पोलिस विभागाशी संपर्क साधला. गटविकास अधिकारी केशव पवार यांनी माहिती मिळताच स्थानिक उपसरपंच यांच्याशी सकारात्मक चर्चा केली व प्रशासनाची टिम येईपर्यंत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू देऊ नये, असे सांगितले. मुला मुलींचे आई-वडील यांची प्रशासनाने तसेच गावातील नागरिकांनी समजूत घातली. बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगून त्यांचे योग्य ते समुपदेशन केले. त्यामुळे आई-वडील यांनी स्वखुशीने विवाह न करण्याचा निर्णय घेतला. तालुक्यातील सर्व नागरिकांनी देखील बाल विवाहांसारख्या चुकीच्या प्रथेपासून दूर राहावे, असे आवाहन यावेळी प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. स्थानिक प्रशासनाच्या सतर्कतेमुळे बाल विवाह रोखण्यात यश आले. जिल्हाधिकारी विकास मिना यांनी राळेगाव प्रशासनाचे व संपूर्ण टिमचे कौतुक केले.